cmyk

## संपादकीय

### नव्या सरकारला ताळमेळ साधावा लागेल

जम्मू-काश्मीरमध्ये लोकनियुक्त सरकार आले. विधानसभा निवडणुकीत नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेस आघाडीने स्पष्ट बहुमत प्राप्त केले. चार अपक्ष आमदारांनीही नॅशनल कॉन्फरन्सचा रस्ता धरला आहे. त्यामुळे काँग्रेसने भविष्यात काही त्रास दिला, तरी उमर अब्दुल्ला यांच्या लवकरच स्थापन होणाऱ्या सरकारला कोणता धोका नसेल. लोकशाहीच्या दृष्टीने आणि राज्यातील राजकीय स्थैर्यासाठी ही चांगली गोष्ट आहे. अशांतता असली किंवा राजकीय बजबजपुरी असली की राज्याचा विकास थांबतो. जम्मू-काश्मीर हे विशेष राज्य असल्यामुळे तेथे अस्थैर्याला स्थान देण्यास मुळीच वाव नाही.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-१७३ | मंगळवार, दि.१५ ऑक्टोबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये


### कोरोना लसीच्या दुष्परिणामावरील याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली

नवी दिल्ली : कोरोनाच्या लसीमुळे रक्त गोठण्यासारखे दुष्परिणाम मानवी शरीरावर झाले आहेत, असा आरोप करणारी जनहित याचिका सोमवारी (दि.१४) सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. ''जर कोरोनाचे लसीकरण झाले नसते, तर काय परिस्थिती उद्भवली असती?,'' असा सवाल न्यायालयाने यावेळी केला. कोरोनाच्या लसीमुळे रक्त गोठण्यासारखे दुष्परिणाम मानवी शरीरावर झाले आहेत, असा आरोप करणारी जनहित याचिका प्रिया मिश्रा आणि आलोक मिश्रा यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती.

# शेतकऱ्यांचा सर्वोच्च न्यायालयाच्या समितीवर आक्षेप

## बोलणी करण्यास नकार, आंदोलनाचा पेच आखणी वाढणार

**दिल्ली । वृत्तसंस्था**

**गेल्या आठ महिन्यांहून अधिक काळापासून पंजाब-हरियाणाच्या शंभू आणि खनौरी सीमेवर शेतकऱ्यांचे आंदोलन सुरूच आहे. आता संयुक्त किसान मोर्चा (अराजकीय) आणि किसान मजदूर मोर्चाने थेट सर्वोच्च न्यायालयाच्या समितीविरोधात नाराजी व्यक्त केली आहे. समितीच्या ७ मुद्द्यांवर आक्षेप घेतले असून, यावरून समितीसोबत बोलण्यास तयार नसल्याचे दोन्ही संघटनांनी म्हटले आहे. यामुळे शेतकरी आंदोलनाचा पेच आणखी वाढण्याची शक्यता आहे.**



२ सप्टेंबर २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश नवाब सिंग यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चाधिकार समिती स्थापन केली होती. ही समिती शेतकऱ्यांच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी गठीत करण्यात आली आहे. या समितीमध्ये सुप्रसिद्ध कृषी अर्थतज्ज्ञ देवेंद्र शर्मा, रणजीत घुमान, डॉ. सुखपाल, बी.एस. संधू आणि हरियाणा कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू बी.आर. कंबोज यांचा समावेश आहे. दरम्यान, न्यायालयाने गठीत केलेल्या समितीने संयुक्त किसान मोर्चा आणि किसान मजदूर मोर्चा यांना पत्र पाठवले होते. त्यावर आता दोन्ही संघटनांनी उत्तरे पाठवली असून कोणत्याही संघटनेने न्यायालयाकडे समिती स्थापन करण्याची मागणी केली नव्हती, असे स्पष्ट केले आहे. दोन्ही संघटनांनी आपल्या उत्तरात ७ मुद्द्यावरून समितीला आपण स्वीकारत नसल्याचे म्हटले आहे. न्यायालयाने आपल्या आदेशात जी समिती स्थापन केली त्याची मागणी संयुक्त किसान मोर्चा (अराजकीय) आणि किसान मजदूर मोर्चाने कधीही केली नव्हती. याआधी देखील तसा प्रस्ताव २०२४ मध्ये केंद्राने पाठवला होता. जो आम्ही फेटाळला. पण तो प्रस्ताव आता शेतकऱ्यांवर जबरदस्तीने लादण्याचा प्रयत्न केला जात आहे, असे या उत्तरात म्हटले आहे. तसेच दुसऱ्या मुद्द्यात आमची मागणी ही डॉ. एम एस स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय कृषी आयोगाच्या शिफारशी प्रमाणे सी २ + ५० टक्क्यांच्या फॉर्म्युल्यानुसार हमीभाव मिळावा अशी आहे. पण याचा लाभ आम्हाला यूपीए किंवा एनडीए सरकारने दिला नाही. यानंतरच २०१५ साली शेतकऱ्यांना सर्वोच्च न्यायालयात जावे लागले. त्यावेळीही आयोगाची शिफारस आम्ही लागू करू शकत नाही, असे लेखी ◀◀ पान २ वर

## एसटीची दिवाळीतील हंगामी भाडेवाढ रद्द



**मुंबई । प्रतिनिधी**

दिवाळीतील प्रवाशांची गर्दी लक्षात घेता एसटी महामंडळाकडून करण्यात आलेली १० टक्के हंगामी भाडेवाढ रद्द करण्यात आली आहे. दिवाळीनिमित्त एसटी महामंडळाकडून दरवर्षी १० टक्के हंगामी भाडेवाढ करण्याचा निर्णय घेतला जातो. यंदा देखील २५ ऑक्टोबर ते २४ नोव्हेंबर दरम्यान तब्बल एका महिन्यासाठी ◀◀ पान २ वर

# आ.आजबेंनी सुरेश धसांच्या अडचणी वाढवल्या!

## आमचे ठरले! धोंडेंना उमेदवारी मिळाली तर मी त्यांचे काम करणार-आ.आजबे

**आष्टी । प्रतिनिधी**

**गेल्या पाच वर्षाच्या कार्यकाळामध्ये आपण मतदारसंघात जवळपास २३०० कोटी रुपये ची विकास कामे मंजूर करून आणले आहेत त्यापैकी अनेक कामे प्रगतीपथावर असून काही कामे पूर्ण झालेली आहेत. हे सर्व कामे करत असताना आपण एक रुपयाचाही कोठे डाग लावून घेतला नाही. जनतेच्या सेवेसाठी निस्वार्थपणे काम करत राहिलो. त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत जनता आपल्याबरोबर राहील तसेच आष्टीची महायुतीची जागा राष्ट्रवादी**







**काँग्रेस पार्टीला सुटणार असून त्यात जर काही खालीवर झाले तर धोंडे साहेबांचे निस्वार्थपणे काम करेल किंवा माझे काम धोंडे करतील, आम्ही दोघे एकत्रच असल्याचे आ. ाळासाहे आजबे ंनी एका कार्क्रमात जाहीर केल्याने माजी मंत्री सुरेश धस यांची मोठी अडचण झाली आहे.**

आष्टी तालुक्यातील महसूल कर्मचारी निवासस्थान व आष्टी नगरपंचायत हद्दीतील १५ कोटी रुपयेच्या विकास कामांचा शुभारंभ आमदार ाळासाहे आजबे यांच्या हस्ते सोमवार, दिनांक १४ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष काकासाहेब शिंदे, माजी जि.प. सदस्य डॉ मधुकर हंर्डे, युवक राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष भाऊसाहे घुले, महादेव महाजन, हरिभाऊ दहातोंडे, परशुराम मराठे, संदीप सुरे, ◀◀ पान २ वर

### धसांच्या उमेदवारीलाच अप्रत्यक्ष विरोध

माजी मंत्री सुरेश धस यांनी विधानसभा निवडणुक लढवण्यासाठी जोरदार तयारी केली असून आपल्यालाच महायुतीची उमेदवारी मिळणार असल्याचे ते ठासून सांगत असल्याने आ. आजबे यांनी आता अप्रत्यक्षपणे धसांच्या उमेदवारीलाच विरोध असल्याचे संकेत दिले आहेत. त्यासाठी धोंडे आणि आजबे एकत्र आल्याचे दिसत आहे.

## ना.धनंजय मुंडेंचे परळी क्रीडा संकुल उभारणीसाठी मोठे पाऊल

●महानिर्मितीची ५ हेक्टर ३० आर जागा क्रीडा संकुलासाठी मोफत हस्तांतरित!

●ऊर्जा विभागाकडुन शासन निर्णय निर्गमित; क्रीडा संकुल उभारणीचा मार्ग मोकळा

**मुंबई । प्रतिनिधी**

**परळी वैजनाथ शहरातील व तालुक्यातील नागरिकांचा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या क्रीडा संकुल उभारण्याच्या दृष्टीने पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी मोठे पाऊल उचलले असून, परळी शहरालगतच्या जलालपूर येथील ५ हेक्टर ३० आर जागा क्रीडा संकुलास मोफत उपलब्ध करून देण्याचा निर्णय आज धनंजय मुंडे यांच्या पुढाकारातून ऊर्जा विभागाने घेतला आहे.**



सदर ५ हेक्टर ३० आर जमीन महानिर्मिती कडून मोफत घेऊन ती महसूल विभागास हस्तांतरित करण्यात येत असून, याबाबातचा शासन निर्णय आज उद्योग-ऊर्जा व कामगार विभागाने निर्गमित केला आहे. त्यामुळे आता परळीच्या क्रीडा संकुल उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे. परळीच्या मातीतून विविध क्रीडा प्रकारातील अनेक खेळाडू राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय ◀◀ पान २ वर

## अभिनेते अतुल परचुरे यांचे निधन

**मुंबई । प्रतिनिधी**



**मराठी कलाक्षेत्रासाठी धक्कादायक माहिती समोर आली आहे. अभिनेते अतुल परचुरे यांचे निधन झाले. वयाच्या ५७ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.**

परचुरे यांनी अनेक नाटके, चित्रपट, मालिकांमध्ये त्यांनी काम केले होते. त्यांच्या अचानक जाण्याने मराठी नाट्य आणि चित्रपट सृष्टीवर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी आणि आई असा परिवार आहे. अनेकजण सोशल मीडियाच्या माध्यमातून श्रद्धांजली वाहताना दिसत आहेत. अतुल यांना कर्करोगाचे निदान झाल्यानंतर त्यांच्यावर उपचार करण्यात आले होते. या संपूर्ण आजारामधून ते सुखरुप ◀◀ पान २ वर

## डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या विकासकामातून बदलतोय बीड मतदारसंघाचा चेहरा-मोहरा!



**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, राष्ट्रीय प्रवक्ते तथा पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पाठपुरावा करून मतदारसंघात कोट्यवधींचा निधी खेचून आणला आहे. बीड मतदारसंघाचा ५ वर्षाचा विकासाचा बॅकलॉग भरून काढत डॉ.क्षीरसागर यांनी चेहरा-मोहरा बदलण्याचा प्रयत्न केला आहे. मागील आठ दिवसात ६ कोटींच्या विकासकामांना प्रत्यक्षात सुरुवात झाली असल्याने ठिकठिकाणच्या नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

प्रगतीपथावर असलेल्या विकासकामांमध्ये पालवण चौक परिसरात ◀◀ पान २ वर

## भगवान गडाचे चौथे मठाधिपती महंत कृष्ण महाराज शास्त्री होणार

### गडाच्या उत्तराधिकाऱ्याची न्यायाचार्य महंत नामदेव शास्त्रींकडून घोषणा





**बीड । प्रतिनिधी**

**भगवान गडाचे उत्तराधिकारी जाहीर केले जाणार असल्याची चर्चा बऱ्याच दिवसापासून होती. अखेर महंत नामदेव शास्त्री यांनी गडाच्या चौथ्या नियोजित मठाधिपतींची घोषणा दसऱ्या दिवशी केली असून निरंजन संस्थानचे महंत कृष्ण महाराज शास्त्री हे भगवान गडाचे मठाधिपती असणार आहेत.** ◀◀ पान २ वर

## यशोदीप कंन्ट्रक्शन कंपनीनीच्या माध्यमातून प्रत्येकाला सुख सुविधायुक्त हक्काचे घर मिळणार-माजी आ.भीमराव धोंडे

### ह.भ.प.बबन महाराज,राऊतदादा महाराज,धस,हंबर्डे,गोल्हार,मेहेर यांच्या उपस्थितीत अंबिका रेसीडेन्सीचे भुमीपुजन




**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी शहर झपाट्याने वाढत आहे. येथे सर्व प्रकारच्या शिक्षणाची सुविधा आमच्या शिक्षण संस्थेने उपलब्ध करुन दिलेली आहे. महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर शिक्षणास आलेले आहेत . शासकीय व निमशासकीय अधिकारी, कर्मचारी वर्ग वाढला आहे. पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा सीमेवारील हा तालुका व शहर आहे. झपाट्याने वाढणाऱ्या या ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१४ ऑक्टोबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १.०० क्विंटल | २,४५१ | २,४५१ | २,४५१ |
| ज्वारी/हायब्रिड:८९.०० क्विंटल | २,१०० | २,९०० | २,२७८ |
| मका/लोकल :१२.५० क्विंटल | २,५०० | २,५०० | २,५०० |
| तूर :१.०० क्विंटल | ७,००० | ८,९३० | ७,९६५ |
| उडीद : ९०.०० क्विंटल | ४,००० | ७,४२१ | ६,४८७ |
| बाजरी : ३१.०० क्विंटल | २,२५० | ३,२०० | २,४८७ |
| मुग : ४.५० क्विंटल | ६,५०० | ७,१०० | ६,७६६ |
| सोयाबीन:१०३८.५० क्विंटल | ३,३५० | ४,३५० | ४,०१० |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ७,५०० | ७,५०० | ७,५०० |

# सुधारीत शेती सेंद्रिय शेती केल्यास नक्कीच मोठा मोबदला मिळतो-माजी मंत्री सुरेश धस

## हवामानावर आधारित शेती करा आर्थिक उन्नती होईल-हवामान तज्ञ पंजाबराव डक

**आष्टी । प्रतिनिधी**

**अन्नधान्याचे उत्पादन वाढावे यासाठी हरितक्रांतीनंतर उत्पादन वाढीसाठी रासायनिक खतांचा मोठ्या प्रमाणावर वापर वाढत चालला आहे .अधिकचे उत्पादन वाढीसाठी रासायनिक खते ,कीटकनाशके, तणनाशकांचा अतिरेक वाढला आहे. त्याचबरोबर उत्पादन खर्चही मोठ्या प्रमाणावर वाढला आहे.रासायनिक खतांचे दुष्परिणाम मोठ्या प्रमाणावर भोगावे लागणार आहेत. यामुळे या पुढील काळात शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीकडे सुधारीत शेतीकडे वळणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री सुरेश धस यांनी केले. तर महाराष्ट्रातील बहुतांश शेती ही जिरायत आहे. सर्वस्वी पावसावरच शेती अवलंबून असल्याने मोठ्या प्रमाणात नुकसानीचा फटका शेतकरी वर्गांना बसत आहे .यामुळे शेतकऱ्यांनी हवामान व पाऊस याची माहिती घेऊनच शेती करण्याचे आवाहन हवामान तज्ञ पंजाबराव डक यांनी केले.**





ते कडा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने आयोजित भव्य शेतकरी मेळाव्यात बोलत होते.हवामान तज्ञ पंजाबराव डक यांच्या मुळे हाजारो शेतकरी वर्गाचे नुकसानी पासुन बचाव झाला आहे. व्यासपीठावर हवामान अभ्यासक पंजाबराव डक,तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे,राजेंद्र दहातोंडे,संदीप खकाळ,संजय आजबे,अशोक पवार,काकासाहेब थेटे, लक्ष्मण ननवरे,संजय गाढवे,आत्माराम फुंदे,अशोक इथापे आदी उपस्थित होते. कडा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने रविवार दि. १३ रोजी कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# मुंबई पोलीस आणि सरकारची नामुष्की

राज्याचे माजी मंत्री, काँग्रेसचे माजी मुंबई प्रदेशाध्यक्ष, तीन वेळा निवडून आलेले आमदार आणि सध्या अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे मुंबईचे नेते असलेल्या आणि मुंबईतील विविध व्यवसायांबरोबरच बॉलीवूडमध्ये वरचष्मा असलेल्या बाबा सिद्दिकी यांचा दसऱ्याच्या रात्री त्यांच्या वांद्रे येथील कार्यालय समोर तीन परप्रांतीय हल्लेखोरांकडून गोळीबार करून खून करण्यात आला. केंद्राची वाय दर्जाची सुरक्षा असताना आणि जीवाला धोका आहे माहीत असताना हा खून झाला आहे. हे मुंबई पोलीस आणि सरकारला नामुष्की आणणारे आहे.

१९९५ च्या सुमारास भाजपचे आमदार प्रेमकुमार शर्मा, शिवसेनेचे विठ्ठल चव्हाण, नगरसेवक खेमबहादुर थापा, जामसंडेकर आणि अलीकडेच शिवसेनेचे नगरसेवक अभिजीत घोसाळकर यांच्या झालेल्या हत्या या राजकीय क्षेत्रात खळबळ माजवणाऱ्या होत्या. अनेक घटना लोकांच्या स्मरणातून गेल्या असल्या तरी गुन्हेगारी क्षेत्रात त्याची चर्चा कायम असते. मुंबईसारख्या देशाच्या आर्थिक राजधानीत अशी घटना घडली की त्याचे खूप दूरगामी परिणाम होतात. एक तर अंडरवर्ल्ड येथे धनिकांना, उद्योगपतींना, फिल्मस्टार्सना आणि या सगळ्यांच्या मागे लपून पैशाची हेराफेरी करणाऱ्या मंडळींना टार्गेट करत असते. त्यांच्याकडून आता वसुली वाढेल. छोट्या-मोठ्या गुन्हेगारांना २५, ५० हजारात गोळ्या घालायला लावायच्या आणि आपली दहशत निर्माण करायची हा इथल्या अंडरवर्ल्डचा मोठा व्यवसाय आहे. पन्नास हजार, लाखासाठी असे मरायला आणि मारायला पावला पावलावर मिळतात. याच लोकांच्या जीवावर अंडरवर्ल्ड टिकले आहे. त्यांचा मध्यस्थ बनून पैसेवाले, बिल्डर, अभिनेत्यांना जिवंत ठेवून संपत्ती वाढवायला मदत करणारे सुद्धा येथे असल्याने हा व्यवहार सुखेनैव सुरू राहतो. पोलिसांना सुद्धा अशा प्रकारचे व्यवहार लाभदायक आणि शांतता प्रस्थापित करणारे असल्याने हवेच असतात. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना, मंत्र्यांना सेलिब्रिटींच्या घोळक्यात रमायला आवडते. त्यामुळे सगळेच अशा व्यवहारांना मान्य करून शांतता असल्याच्या खोट्या नंदनवनात वावरत राहतात. सिद्दिकी यांच्या खुनानंतर ही शांतता भंग पावली आहे. वास्तविक अभिनेता सलमान खान याच्या घरावर झालेला गोळीबार आणि त्या गोळीबारातील आरोपीचे कोठडीत झालेले निधन लक्षात घेतले तर नेमके त्याच काळात बाबा सिद्दिकी यांनी आपल्या जीवाला धोका असल्याचे सरकारला कळवले होते. अर्थात आयुष्यभर सरकारच्या वर्तुळात राहिलेले आणि २०१४ नंतर पुन्हा अलीकडेच अजित पवारांच्या पक्षात प्रवेश करून पुन्हा स्वत:भोवती सरकारी वलय घेऊन फिरणारे बाबा सिद्दिकी यांचा खून होईल असे कदाचित पोलिसांनाही वाटले नसावे. मात्र दसऱ्याच्या फटाक्याच्या आवाजात वाय दर्जाच्या बंदोबस्ताला आणि खुद्द सिद्दिकी यांच्या कार्यकर्त्यांच्या सुरक्षा व्यवस्थेला भेदत हत्या झाली. हे इतके सहज सोपे नाही. विशेष म्हणजे बिश्नोई गँगने या हत्येची जबाबदारी सुद्धा स्वीकारली. पोलिसांनी तत्परता दाखवत दोन आरोपींना अटक केली असून तिसरा परागंदा झाला आहे. तिघातील दोघे उत्तर प्रदेशी तर एक हरियाणाचा आहे. महिन्याला पन्नास हजाराच्या बोलीवर गेले ४० दिवस ते मुंबईतील कुर्ला भागात राहत होते. त्यातील एक तर भंगारच्या दुकानात कामाला होता आणि त्यानेच काम देतो म्हणून दुसऱ्याला बोलावून घेतले होते. हे लक्षात घेतले तर सिद्दिकी यांचा खून हा मोठा कट आहे आणि तो पूर्वनियोजित सुपारी आहे. मुख्यमंत्र्यांसह पोलीस अधिकाऱ्यांनी त्याला पुष्टी दिली.

बिश्नोई टोळीच्या संदेशात सलमानचा उल्लेख आहे ही सगळी जाहीर झालेली माहिती म्हणजे मुंबईतील पैसेवाल्यांना भीती घालण्याचा नवा उद्योग आहे. आम्ही सत्तेतला माजी मंत्री वाय दर्जाची सुरक्षा व्यवस्था असताना मारू शकतो तर तुम्ही कुठे पळून जाल? कुणाला शरण जाल? हा या हत्येमागील खरा संदेश आहे.

अंडरवर्ल्डचे डोके पुन्हा एकदा वर निघाले आहे असे म्हणावे तर ते जमिनीत तोंड घालून कधी बसले होते? असा प्रश्न निर्माण होतो. सरकारमध्ये तीन-तीन घटक सत्तेत असताना, राज्याची, केंद्राची गुप्तचर यंत्रणा असताना ज्या माजी मंत्र्यांनी आपल्या जीवाला धोका आहे असे पंधरा दिवस आधी सांगितले होते, त्याला जी कुचकामी सुरक्षा व्यवस्था दिली गेली. आता लोकांनी त्या व्यवस्थेवर विश्वास ठेवावा का? हा प्रश्नच आहे. मुळात गेल्या काही वर्षात केंद्र सरकारने या वाय दर्जाच्या सुरक्षा व्यवस्थेचे अगदीच फोलपाट करून टाकले आहे. जरा कोणाची तक्रार आली की त्याला वाय दर्जाची सुरक्षा दिली जाऊ लागल्याने सिद्दिकी यांच्यासारख्या जीव धोक्यात असणाऱ्या व्यक्तीचा हकनाक बळी गेला असे म्हणावे लागेल. या हत्येच्या कहाण्या दुर्दैवाने भविष्यकाळात चवीने चघळल्या जातील. अलीकडे तर गुन्हेगार आणि गुन्हेगारीवृत्तीचे पोलीस अधिकारी यांच्या हिरोगिरीसाठी अनेक युट्युबर असल्या कथा लोकांना ऐकवून अशा मंडळींबाबत आदरभाव निर्माण करतात. त्यातून ते मोठी कमाई करू लागले आहेत. त्यांच्यासाठी आता ही हत्या भविष्यात बरेच दिवसांची बेगमी ठरेल. राज्याच्या कायदा सुव्यवस्थेबाबत विरोधी पक्षाच्या सर्वच नेत्यांनी जाब विचारला आहे तसा आता जनतेने जाब विचारावा की प्रकाश आंबेडकर यांनी दाखवलेल्या नव्या डायमेन्शन प्रमाणे ही हत्या बिल्डरमुळे की राजकीय कारणातून सुपारी देऊन झाली? हा विषय चघळत रहावा. सरकार आणि पोलिसांवर ओढवलेल्या या नामुष्कीनंतर आरोपी पकडून त्यांना शिक्षा लागण्यापासून यामागील सूत्रधार शोधण्यापर्यंतचे काम ही यंत्रणा करेल का, हा प्रश्नच आहे. सत्य सात पडद्याच्या आड दडवून भलतेच कथानक जनतेच्या तोंडावर मारण्याचे काम अशा प्रकारात होत असते. मात्र किमान नामुष्की टाळण्यासाठी यातील जास्तीत जास्त सत्यापर्यंत पोलीस जेव्हा लोकांना घेऊन जातील तेव्हाच अशा घटनांना आळा बसेल. निवडणुकीच्या तोंडावर सरकारला हे एक भलतेच प्रकरण भोवले आहे आणि त्यात सिद्दीकी यांचा जीव गेला हे अधिक भयानक आहे.

# जालना शहर हादरले!

## ८ वर्षाच्या मुलीवर अत्याचार

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील चंदनझिरा भागात चिमुकलीवर झालेल्या अत्याचार प्रकरणी पोलिसांनी एका नराधमास गजाआड केले. १३ ऑक्टोंबर रोजी रात्री ११ वाजेच्या सुमारास जालना शहरातील चंदनझिरा भागातील एका ८ वर्षाच्या चिमुकलीला पळवून नेत काही नराधमांनी तिच्यावर अत्याचार केला होता. चिमुकलीची आई कामगार साहित्य आणण्यासाठी गेली असताना घरात एकट्या झोपलेल्या चिमुकलीस काहीनी बळजबरीने उचलून नेत तिच्यावर अत्याचार केला. या घटनेनंतर चंदनझिरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.दरम्यान अत्याचाराच्या घटनेनंतर पीडितेला तातडीने जिल्हा स्त्री रुग्णालयात दाखल करण्यात आले त्याठिकाणी तिला प्रथोपाचार देऊन पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे



पाठवण्यात आले.

नागरिकांचा रास्ता रोको तिसरी मध्ये शिकणार्या मुलीवर बलात्कार झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे संतप्त नागरिकांनी दुसर्या दिवशी १४ ऑक्टोंबर रोजी सकाळी ११ वाजता जालना-औरंगाबाद महामार्गावर जोरदार निदर्शने करीत रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.यावेळी संतप्त नागरीकांच्या वतीने पोलीस प्रशासना विरुध्द जोरदार घोषणाबाजी करण्यात आल्या. बदलापूर घटनेच्या सारखे आरोपीचे एन्काऊंटर करण्याची मागणी संतप्त नागरिकांनी केली. यावेळी महामार्गावर गाड्यांची दोन्ही बाजूच्या लांबचलांब रांगा लागल्या होत्या. यावेळी जालनाचे आमदार कैलास गोरंट्याल, भास्कर आंबेकर, अभिमन्यू खोतकर माजी नगरसेवक गणेश राऊत, सतीश जाधव, अंबादास चितेकर यांच्यासह हजारोंच्या संख्येने परिसरातील नागरिकांनी महामार्गावर ठिय्या आंदोलन केले. चंदनझीरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सम्राट सिंग राजपूत, पोलीस उपनिरीक्षक सचिन सानप, यांच्यासह पोलिसांचा मोठा फौज फाटा आंदोलन स्थळी तैनात होता. चंदनझीरा पोलीस ठाण्याचे पो.नि. राजपूत यांच्या अश्वासनानंतर आंदोलकांनी आंदोलन मागे घेतले.

### २० तासात नराधमास ठोकल्या बेड्या

आदित्य सुभाष जाधव (वय १९ वर्षे रा. मातोश्रीनगर, चंदनझिरा, जालना) या नराधमास स्थागुशा पोलिसांनी ताब्यात घेवून चौकशी केली असता, त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली. सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल ,अपर पोलीस अधिक्षक श्री. आयुष नोपाणी, उप विभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांचे मागदर्शनाखाली तसेच पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि. योगेश उबाळे, पोउपनि. श्री. राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार सॅम्युअल कांबळे, संभाजी तनपुरे, प्रभाकर वाघ, दिपक घुगे, रमेश राठोड, जगदीश बावणे, सागर बाविस्कर, ईरशाद पटेल, देविदास भोजने, भागवत खरात सर्व स्थानिक गुन्हे शाखा, जालना यांनी केली आहे.

# शिवसंग्राम आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघाची आढावा बैठक

**बीड । प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी ''परिवर्तन संकल्प यात्रा'' काढली आहे. यात त्या जिल्ह्यासह बीड विधानसभा मतदार संघात जनतेशी आणि कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांशी संवाद साधणार आहेत. या यात्रेच्या अनुषंगाने त्यांनी दी. १४ ऑक्टोबर रोजी आष्टी, पाटोदा, शिरूर तालुक्याची आढावा बैठक हॉटेल सद्गुरू, धामणगांव रोड, कडा घेतली. यात आष्टी विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीत बोलत असताना आपण शिवसंग्रामच्या वतीने निवडणूक लढावी अशी अनेकांची इच्छा आहे यावर मी योग्य तो निर्णय



घेईल असे डॉ. ज्योती मेटे म्हणाल्या.

लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या निधननंतर देखील शिवसंग्रामचे अस्तित्व त्याच तोलाचे आहे. साहेब कायम विस्थापिता सोबत खंबीर पने उभा राहिले. त्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवत राहिले आणि त्यांना राजकीय पटलावर संधी देत राहिले. शिवसंग्राम साहेबांच्या पश्चात त्यांच्या विचाराशी कधीही तडजोड करणार नाही. काल दसरा मेळाव्याला नारायण गडावर उपस्थित राहण्याचे भाग्य मिळाले यावेळी देखील महाराष्ट्रभरातील अनेकांनी साहेबांच्या आठवणींना उजाळा दिला. त्याचबरोबर मी बीड विधानसभा निवडणूक शिवसंग्राम कडून लढावी अशीही इच्छा अनेकांनी बोलून दाखवली यावर देखील मी योग्य वेळी निर्णय घेईल परंतु आता तुम्ही जोमनी कामाला लागा त्याचबरोबर आपण या परिवर्तन संकल्प यात्रेच्या माध्यमातून जिल्हा सह बीड विधानसभा मतदारसंघात जनतेशी संवाद साधणार आहोत. असे प्रतिपादन यावेळी बोलताना डॉ. ज्योती मेटे यांनी केले.

## पान १वरून...

### शेतकऱ्यांचा सर्वोच्च न्यायालयाच्या

उत्तर केंद्र सरकारने न्यायालयात दिले होते. पण नंतर आम्ही सत्तेत आल्यास शिफारस लागू करू, असे आश्वासन भाजपने दिले होते. आता त्यावरूनही भाजपने घुमजाव केल्याचं दोन्ही संघटनांनी म्हटले आहे. तिसऱ्या मुद्द्यात न्यायालयात फक्त शेतकऱ्यांच्या सशस्त्रावर चर्चा होते. जे सत्य नाही. मात्र सरकारने शेतकऱ्यांवर केलेल्या अत्याचारावर कुठेही चर्चा होत नाही किंवा तसा उल्लेख नाही. आंदोलनात ४३३ शेतकरी जखमी झाले, ५ शेतकऱ्यांची दृष्टी गेली, तरुण शेतकरी शुभकरन सिंह यांचा मृत्यू झाला याबाबत कोणती चौकशी झाली? असाही सवाल करण्यात आला आहे. चौथ्या मुद्द्यात एकीकडे न्यायालयाच्या आदेशात समितीच्या अध्यक्ष व सदस्यांना खर्च, मेहनत आणि केलेल्या कामाच्या प्रमाणात मोबदल्यावर चर्चा होते. मात्र दुसरीकडे आयोगाच्या शिफारशी प्रमाणे सी २ + ५० टक्क्यांच्या फॉर्म्युल्यानुसार हमीभाव शेतकऱ्यांना मिळावा यावर चर्चा होत नसल्याची खंत व्यक्त करण्यात आली आहे. पाचवा मुद्दा हा शेतकऱ्यांनी राजकारणापासून दूर रहावे हा आहे. पण संपूर्ण जगाला या आंदोलनाची माहिती असून ते पूर्णपणे अराजकीय असल्याचे माहित असल्याचे संघटनांनी म्हटले आहे. तसेच शेतकऱ्यांनी आपला मोर्चा किंवा आंदोलन इतर ठिकाणी न्यावा असेही न्यायालयाने म्हटले होते. मग आम्हाला दिल्लीला का जाऊ देत नाहीत असा सवाल सहाव्या मुद्द्यातून समितीला केला आहे. न्यायालयाच्या समितीने पाठवलेल्या पत्रात समितीच्या शिफारशी लागू करण्याच्या अधिकाराबाबत चर्चा केलेली नाही. यामुळे आम्ही समितीशी बोलू शकत नाहीत अशी भूमिका संयुक्त किसान मोर्चा (अराजकीय) आणि किसान मजदूर मोर्चाने घेतली आहे. यानंतर आता नवा पेच निर्माण होण्याची शक्यता आहे.

----------

### आ.आजबेंनी सुरेश धसांच्या

नगरसेवक नाजीम शेख, सुखदेव पोकळे यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना आमदार आजबे म्हणाले की, आष्टी नगरपंचायत अंतर्गत आपण मोठ्या प्रमाणात निधी आणला आहे. आष्टी पाटोदा शिरूर या तिन्ही नगरपंचायतमध्ये जवळपास पंधरा कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. कामे करताना नगरपंचायतला विश्वासात घेऊन कामे कार्यकर्त्यांनी करावीत कुठल्याही प्रकारची अडचण येणार नाही याची पण खबरदारी संधित गुत्तेदार यांनी घ्यावी, अशा सुचनाही त्यांनी यावेळी केल्या. आष्टी येथील शनी मंदिर व फत्तेशहा खारी दर्गा परिसरात नारळ फोडून कामांचा शुभारंभ करण्यात आला तर आष्टी तालुक्यातील महसूल कर्मचाऱ्यांसाठी १३ कोटी ८० लक्ष रुपयांच्या महसूल निवासस्थानाच्या इमारतीचे उद्घाटन पंचायत समिती शेजारी परिसरात करण्यात आले यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की, आष्टी पाटोदा शिरूर या तिन्ही तालुक्यातील शासकीय कार्यालयासाठी जवळपास १०० ते १५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. त्याचबरोबर या कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाकरिता ही मोठ्या प्रमाणात निधी मंजूर करून केला असून त्यामुळे यापुढे सरकारी कर्मचाऱ्यांच्या कार्यालय व त्यांचे निवासस्थाने हे सुसज्ज असणार असल्याचे ते म्हणाले. येणारी निवडणूक ही जनतेच्या विश्वासावर व विकास कामाच्या जोरावर आपण सामोरे जाणार असल्याचे सांगून आ. आजबे म्हणाले, मला तिकीट मिळाले तर धोंडे साहे माझे काम करतील, त्यांना उमेदवारी ळिाली तर मी त्यांचे का मनापासून करणार असल्याचे आ. आजबे यांनी यावेळी जाहीर केले. त्यामुळे धोंडे आणि आजबे यांचे विधानसभेसाठी जे ठरायचे ते ठरले असल्याचे दिसत असून माजी मंत्री सुरेश धस यांच्या उमेदवारीला आपला विरोध असल्याचे त्यांनी अप्रत्यक्षपणे सांगून टाकले आहे. त्यामुळे धस यांच्या अडचणी वाढल्या असल्याचे दिसत आहे. या कार्यक्रमासाठी ग्रा. प. सदस्य संतोष कदम, बबन काळे, गणेश पडोळे, पंडित पोकळे, काका पोकळे, दिपक पिसाळ, श्रीराम गोंदकर, दिलीप चव्हाण, विजय देशमुख, देवेश शेट्टी, अय्याज कुरेशी, वाहेद सय्यद, गणेश धोंडे, माजेद शेख, विलास गायकवाड, मुकेश सायकड, काशीगिर शिंगारे, कृषी वाल्लेकर, आकाश पवळे, सुनिल निकाळजे यांच्यासह आष्टी शहरातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

--------

### एसटीची दिवाळीतील

ही भाडेवाढ लागू करण्यात आली होती. मात्र, प्रवाशांना दिलासा देत एसटी महामंडळानं भाडेवाढ रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. भाडेवाढीमुळे राज्यातील नागरिकांचा एसटीचा लांब पल्याचा प्रवास महागणार होता. आता मात्र त्यांना या निर्णयाचा फायदा मिळणार आहे. एसटीची प्रस्तावित १० टक्के भाडेवाढ विठाई, शिवशाही, निमआराम बसेससाठी लागू होती. मात्र, ती भाडेवाढ आता रद्द करण्यात आली आहे. एसटीच्या या निर्णयामुळे प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.

------------

### डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या विकासकामातून

योगभूषण कॉलनी, शहेंशावली दर्ग्याच्या मागील बाजूस, प्रभाग क्रमांक २ मधील बारादरी, शिंदे यांचा मला, जुने सावरकर कॉलेज परिसर येथील अंतर्गत गल्ली, पंचशील नगर भागातील त्रिरत्न बौद्ध विहार परिसर, नवीन सरस्वती विद्यालय परिसरातील राधाकिसन नगर, प्रभाग क्र.१३ मध्ये विविध सिमेंट रस्ते व नाली बांधकाम, अंतर्गत ९ रस्ते, हायमास्ट सोलार दिवे बसविणे, हनुमान मंदिर येथे सामाजिक सभागृहाचे बांधकाम, सिंहगड कॉलनी नं.२ व जटाशंकर गल्ली, जालना रोड परिसरातील सागर हॉस्पिटल गल्ली, फुलाई नगर, कॅनॉल रोड परिसर, अंबिका चौक परिसर, अंकुश नगर परिसरातील नंदनवन कॉलनी, ग्रामीण पोलीस स्टेशन परिसर, कबाड गल्ली, पिंगळे गल्ली येथील गवळी समाज मंदिर, संत सावतामाळी सभागृह येथे कंपाउंड वॉल, इमामपूर रोड येथे मांग गारुडी समाजाचे सभागृह, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या अर्धाकृती पुतळ्याच्या समोर छत बांधकाम, बंकटस्वामी महाविद्यालय परिसरात त्यागी निवास (जैन मंदिर) येथे कंपाउंड वॉल, चांदणी चौक परिसरात ढोर समाजाचे सामाजिक सभागृह, पेठ बीड भागातील लोणारपुरा परिसरात लोणार समाजाचे सामाजिक सभागृह, नाळवंडी नाका परिसरातील शास्त्रीनगर अंतर्गत सिमेंट रस्ता, गांधी नगर परिसरातील वडार समाज वस्ती, मोमीनपुरा भागातील कुरेशी मोहल्ला, धोंडीपुरा भागातील केंडेवाडा गल्लीत पेव्हर ब्लॉक, रस्ता व नाली, क्रांती नगर भागातील छत्रपती कॉलनी, धानोरा रोड भागातील महात्मा फुले नगर, बापूजी नगर या भागातील रस्ते व नाली, पेव्हर ब्लॉकसह सभागृह, बांधकामाचा समावेश आहे. तसेच, ग्रामीण भागात ५ कोटींचा निधी आहे. या सर्व कोट्यवधींच्या कामांच्या भूमिपूजन प्रसंगी ठिकठिकाणी डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, माजी नगरसेवक, सरपंच आदींची उपस्थिती होती.

**ग्रामीण, शहरी भागात बरोबरीने निधी दिला -डॉ.योगेश क्षीरसागर**

उपमख्यमंत्री अजितदादा, पालकमंत्री धनुभाऊ यांच्या माध्यमातून शासन, प्रशासनाकडे पाठपुरावा करून वर्षभरात बीड विधानसभा मतदारसंघात ग्रामीण, शहरी भागात आपण बरोबरीने निधी दिला. नुकतेच आठ दिवसात ७ कोटींच्या कामांना सुरुवात केली आहे. नागरिकांना अधिकाधिक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील असतो. कामे दर्जेदार करून घेण्यासाठी माझ्यासह यंत्रणेचे लक्ष असते, असे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

-------------

### अभिनेते अतुल

बाहेर पडले होते. पुन्हा त्यांनी अभिनयक्षेत्रात दमदार कमबॅक केले होते. काही महिन्यांपूर्वी त्यांचा अलीबाबा आणि चाळीशीतले चोर हा सिनेमा प्रदर्शित झाला होता.

------------

### ना.धनंजय मुंडेंचे परळी क्रीडा

पातळीवर पोहोचले आहेत. दरवर्षी धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर क्रिकेटसह विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजनही केले जाते. मात्र या खेळाडूंना सरावासाठी क्रीडा संकुल उपलब्ध नसल्याने खेळाडूंची गैरसोय होत होती. त्यादृष्टीने धनंजय मुंडे यांनी क्रीडा विभागामार्फत राज्याचे क्रीडामंत्री संजय बनसोडे यांच्यामार्फत जमीन ऊर्जा विभागाकडून हस्तांतरित करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्ताव मंजूर करण्यासाठी धनंजय मुंडे यांनी उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ही सातत्याने पाठपुरावा केला. या पाठपुराव्याला अखेर आज यश आले असून महानिर्मितीच्या परळी येथील औष्णिक विद्युत केंद्राच्या मालकीची जलालपुर येथील ८.५ हेक्टर जागेपैकी वापरात नसलेली व भविष्यात कोणतेही प्रयोजन नसलेली ५ हेक्टर ३० आर जमीन क्रीडा संकुलासाठी मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहे. परळीत धनंजय मुंडे यांच्या मागणीनुसार भव्य क्रीडा संकुल अद्ययावत सोयी-सुविधांसह उभारले जावे यासाठी मागील वर्षी छत्रपती संभाजीनगर येथे पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीत १९ कोटी ७५ लाख रुपयांच्या आराखड्यास याआधीच मान्यता देण्यात आलेली आहे, त्यामुळे क्रीडा संकुल उभारणीसाठी पुरेसा निधीही उपलब्ध आहे. जिल्हाधिकारी बीड यांचे मार्फत सदर जमीन क्रीडा विभागास हस्तांतरित करून उभारणीबाबतची पुढील कार्यवाही तातडीने सुरू करावी असे निर्देश धनंजय मुंडे यांनी संबंधितांना दिले आहेत. तसेच या निर्णयाबद्दल श्री मुंडे यांनी उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभारही व्यक्त केले आहेत.

-------------

### यशोदीप कंन्ट्रक्शन कंपनीनीच्या

शहरातील जनतेला पिण्याचे पाणी भरपुर व स्वच्छ मिळण्यासाठी आष्टी शहरराला कायमस्वरुपी पिण्याचे पाण्याची व्यवस्था जायकवाडीतुन झाल्यास आणखी शहराचा विस्तार व प्रगती होईल.भुकन व त्यांचे सहकारी बांधव उभारत असलेले असे आणखी गृहप्रकल्प होतील.आज भुमीपुजन होत असलेल्या या यशोदीप कंन्ट्रक्शन कंपनीनीच्या गृह प्रकल्पाने आष्टीच्या वैभवात भर पडणार असे प्रतिपादन माजी आ.भीमराव धोंडे यांनी केले. आष्टी येथे इंजि.बाळासाहेब भुकन,गोकुळ धोंडे ,बाबासाहेब धोंडे व यशोदीप कन्स्ट्रक्शन आणि समृद्धी यश डेव्हलपर्स यांचे द्वारे आष्टी येथे अद्ययावत सोयी सुविधांनी युक्त असे १०० सदनिका बांधकामाचे भुमीपुजन व प्लट विक्री आफीसचा शुभारंभ कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानवरुन बोलत होते. यावेळी ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल,माजी आ.भीमराव धोंडे,सरपंच शामभैय्या धस,सौ. सविताताई गोल्हार ,ह.भ.प.राऊतदादा महाराज ,निळकंठ महाराज तावरे,ह.भ.प.संतोष महाराज मोरे,ह.भ.प. दादा महाराज चांगुणे,दिलीपदादा हंबर्डे,किशोर हंबर्डे,संतोषशेठ मेहेर,संजय मेहेर, व्यापारी असो,अध्यक्ष संपत शेळके यांच्या हस्ते भुमीपुजन झाले. यावेळी आर्किटेक खैरे पाटील (पुणे),रविशेठ ओस्वाल ( व्यापारी असोशिशन पुणे), शिरीष जाधव (त्रिमुर्ती डेव्हलपर्स पुणे),समीर सय्यद (पुणे बिल्डर), अ.भा.म.फुले समता परिषदेचे नेते प्रितेश गवळी,मिलिंद वालवडकर (पुणे),हसन मुश्रीफ यांचे स्वीय सहाय्यक शैलेंद्र चाटे,विकास हजारे,आर्किटेक मनोहर येरावार, धैर्यशील खैरे पाटील,समाजसेवक विजय गोल्हार,डा. शिवाजी राऊत, आण्णासाहेब चौधरी, सुनिल नाथ, काकासाहेब शिंदे, विठ्ठलराव बन्सोडे, सरपंच सावता ससाणे,अशोक साळवे,विक्रम पोकळे,शंकर देशमुख, पत्रकार उत्तम बोडखे, प्रविण पोकळे, हिवरकर,आमोल भंडारी,रत्नदीप निकाळजे,संजय टेकाडे,आनंदराव बन्सोडे, माजी सरपंच अतुल कोठुळे,इंजि.संदीप घोलप, इंजि.पी.बी. बोडखे,रविशेठ अग्रवाल, टाऊन प्लन आफीसर डोंगरे,मनोज धस,सुनिल मेहेर, नवीन कासवा आदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी माजी आ.भीमराव धोंडे म्हणाले की,अहिल्यानगर ते बीड यादरम्यान सात मजली टॉवर्स येथे उभारण्यात येणार आहे. अंत्यंत गरीब कुंटुबातुन इंजि.बाळासाहेब भुकन आलेले आहेत. कष्टाने त्यांनी बांधकाम व्यावसायात यश मिळविलेले आहे. भुकन हे '' रेरा '' कायद्यानुसार सर्व सोयी सुविधा उपलब्ध करणार आहेत.अंबिका रेसिडेन्सी येथे २ चे ८४ फ्लॅट आणि ३ चे १४ फ्लॅट आणि जिम क्लब हाऊस योगा सेंटर असे एकूण १०० फ्लॅटचे बांधकाम करणार आहेत. सात मजली तीन टॉवर्समध्ये हे बांधकाम होणार आहे.या निवासी इमारतींमध्ये दोन बीएचके आणि थ्री बीएचके फ्लॅट उपलब्ध होणार आहेत. अंबिका रेसीडेन्सी या ईमारतीने आष्टीच्या वैभवात नक्कीच भर पडणार आहे असे भीमराव धोंडे यांनी यावेळी सांगीतले. प्रस्ताविक करताना इंजि. बाळासाहेब भुकन म्हणाले की, अंबिका रेसीडेन्सी इमारतींपासून १२ मीटर रुंदीचा डीपी रोड मंजूर आहे.येथील रहिवाशांसाठी ही मोठी सुविधा आहे या तीनही इमारतींमध्ये आष्टी नगर पंचायतद्वारे आणि कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेकडून पुरेसा पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. बायोमेट्रिकल लिफ्ट बसवण्यात येणार असल्यामुळे अनोळखी नागरिकांना या इमारतीत प्रवेश करता येणार नाही.सुरक्षेच्या दृष्टिकोनातून ही मोठी सोय होणार आहे.या सर्व फ्लॅटचे वास्तु शास्त्रानुसार बांधकाम करण्यात येणार आहे.सर्व इमारतींना कॉमन लाईटसाठी सोलर सिस्टिमद्वारे वीज पुरवठा करण्यात येणार आहे. सीसीटीव्हीच्या निग्रणीखाली संपूर्ण परिसर येणार आहे.सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात येणार आहे.प्रत्येक फ्लॅट धारकाला स्वतंत्र वाहन पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे.या परिसरामध्ये जिम क्लब हाऊस योगा सेंटर चिल्ड्रन पार्क आणि खुल्या जागेमध्ये बाग बगीचा तयार करण्यात येणार आहे.अंबिका रेसिडेन्सीच्या सर्व फ्लॅटचे बांधकामाचा कालावधी २४ महिने एवढा असून फ्लॅट बुकिंग लवकर झाल्यास हा कालावधी कमी देखील होऊ शकतो.अंबिका रेसिडेन्सीच्या बांधकामासाठी स्वतंत्र आरपीसी प्लांट उभा करण्यात आला आहे. त्याद्वारे अधिक गतिमान पद्धतीने बांधकाम करण्यात येणार आहे फ्लॅटची बुकिंग करण्यासाठी १ लाख रु. एवढी रक्कम भरावी असे आवाहन इंजि.भुकन यांनी केले. यावेळी भाजपनेते शंकर देशमुख, ह.भ.प.निळकंठ महाराज तावरे, ह.भ.प.राऊतदादा महाराज, किशोरनाना हंबर्डे ,संजयशेठ मेहेर, रविशेठ ओस्वाल,ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल यांची भाषणे झाली.या कार्यक्रमाचे बहारदर सुत्रसंचलन निलेश दिवटे यांनी तर उपस्थितांचे आभार गोकुळ धोंडे यांनी मानले.

-------------

### भगवान गडाचे चौथे मठाधिपती

हंत नामदेव शास्त्री ांनी त्यांचे शिष महंत कृष्ण महाराज शास्त्री यांची गेल्या तीन वर्षापुर्वी दसऱ्या दिवशी एकनात्रवाडी येथील निरंजन संस्थानचे महंत म्हणून कृष्ण महाराज यांनी निवड केली होती. कृष्ण महाराज हे गडाच्या पहिल्या बॅचचे विद्यार्थी असून त्यांची गडाचे नियोजित मठाधिपती म्हणून महंत नामदेव शास्त्री यांनी दसऱ्या दिवशी घोषणा केली. गडाचे ते उत्तराधिकारी असणार असून येत्या दोन वर्षात महंत कृष्ण महाराज हे गडाचे कामकाज, अर्थ नियोजन, बांधका, भक्त सुविधा यासह इतर कामांच्या बाबतीत महंत नामदेव शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण घेणार असल्याचे समजते. त्यानंतर त्यांना गडाचे मठाधिपती म्हणून गादीवर विराजमान केले जाणार असल्याचे म्हटले जात आहे.

------------

### सुधारीत शेती सेंद्रिय शेती केल्यास नक्कीच

केल्याबद्दल महाराष्ट्र शासनाकडून पुरस्कर प्राप्त बीड जिल्ह्यातील बारा मान्यवरांचा सत्कार माजी आमदार सुरेश धस व हवामान तज्ञ पंजाबराव डक ,सभापती रमजान तांबोळी,सचिव हनुमंत गळगटे व संचालक मंडळ यांच्या हस्ते करण्यात आला. यामध्ये प्रियंका गणेश सावंत, केशव श्रीरंग रसाळ, बाबासाहेब नानाभाऊ पिसोरे ,श्रीमती विजया गंगाधर घुले ,संजय ज्ञानोबा शिंदे, मोहन निवृत्ती पवार, राजेंद्र भानुदास देवरवाडे ,अमोल भास्कर मुळे, मुक्ताराम सोनवणे ,अर्जुन जनार्दन चव्हाण, विनायक देशमुख यांचा प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी पुढे बोलताना माजी आमदार सुरेश धस म्हणाले की ,येत्या काळात आष्टी मतदारसंघातील जिल्हा परिषद सर्कल निहाय हवामान तज्ञ पंजाबराव डक यांचे मार्गदर्शन शिबिरे घेण्यात येणार असून पंजाबराव डक यांच्या हवामान अंदाजामुळे अनेक शेतकऱ्यांचे कोट्यावधी रुपयाचे नुकसान होण्यापासून वाचत आहे .पंजाबराव डक यांचा अंदाज गेल्या अनेक वर्षापासून खरा ठरत असून मी देखील त्यांचा चाहता झाल्याचे सांगितले.पंजाबराव डक यांना महाराष्ट्र शासनाने शेतीचा ब्रँड अँबेसेडर करण्याची मागणी मंत्रिमंडळासमोर करणार असल्याचेही धस यांनी सांगितले .शासनाने या पुढील काळात शेतकऱ्यांचे नुकसान भरपाई ही ड्रोनद्वारे करायला हवी.सरसकट नुकसान भरपाईचे पंचनामे करताना अनेक ठिकाणी अफरातफर होत असून अनेक शेतकरी नुकसान भरपाई पासून मागे राहत आहेत.त्यामुळे शासनाने ड्रोन द्वारे नुकसान भरपाईची पाहणी केल्यास प्रत्येक शेतकऱ्याला नुकसान मिळेल .बीड जिल्ह्यामध्ये कृषी क्षेत्रात काम केलेल्या अनेकांना शासनाने पुरस्कार देऊन गौरविल्याबद्दल त्यांचा सत्कार सोहळा बाजार समितीच्या वतीने करण्यात येत आहे हा एक भाग्याचा क्षण आहे .शेतकऱ्यांनी बिबट्याला घाबरून जाऊ नये तो शेतकऱ्यांचा मित्र असून शेतातील रानडुकरे कमी करण्याचे तो काम करत आहे .कांदा चाळीसाठी सामूहिक हा शब्द काढून टाकून वैयक्तिक लाभाच्या कांदा चाळीसाठी कृषी विभागाकडे शेतकऱ्यांनी अर्ज करण्याचे आवाहन केले .मी सभागृहामध्ये कांद्याचे दर पडलेले असताना अनेक वेळेला आवाज उठवला आणि शासनाला अनुदान देण्यास भाग पाडले .कडा कृषी उत्पन्न बाजार समितीला जवळपास २२ कोटी रुपयांचे कांदा अनुदान मिळाले होते .या मतदारसंघांमध्ये फेसबुक आणि व्हाट्सअप वर प्रसिद्धी करणारे काही जण सध्या वावरत आहेत .फेसबुक व सोशल मीडियावर फोटो टाकून जनतेची कामे होत नाहीत.त्यासाठी प्रत्यक्ष फिल्डवर जाऊनच काम करावे लागते .कोरोना काळामध्ये जनमानसामध्ये कोणीही जात नसताना मी अनेक ठिकाणी कोविड सेंटर उभारून लोकांची जीव वाचवण्याचे काम केले. यावेळी बोलताना पंजाबराव डक म्हणाले की ,शेती हा अर्थव्यवस्थेचा कणा असून ५० टक्के पेक्षा जास्त शेती ही कोरडवाहू शेती आहे .पावसावरच शेती अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांनी हवामानाचा अंदाज घेऊन शेती करायला पाहिजे .१९९५ नंतर निसर्गामध्ये बदल झालेला असून अनेक ठिकाणी कधी गारपीट तर कधी दुष्काळाचा सामना करावा लागत आहे .पंजाबराव डक यांनी पाऊस येण्याचे अनेक संकेत उदाहरणासह पटवून देत शेतकऱ्यांना जागृत करण्याचे काम केले .निसर्ग हा आपल्याला पावसाचे संकेत कसा देतो याचे उदाहरणासह त्यांनी शेतकऱ्यांना पटवून दिले .ज्या वर्षी रामफळाच्या झाडाला जास्त फळ लागतात त्यावर्षी दुष्काळ पडतो .विजेच्या बल्ब वर जर किडे आले तर तीन दिवसात पाऊस हमखास येतो .आकाशातून जाताना विमानाचा आवाज जर खाली आला तर ते पाऊस येण्याचे संकेत असतात अशा अनेक प्रकारचे एक ना शेकडो पाऊस येण्याचे संकेत आहेत .ज्यावेळेस सूर्य मावळताना आकाश लाल भडक होते त्यानंतर ७२ तासांमध्ये पाऊस हा निश्चितच येतो हे पावसाचे संकेतही त्यांनी सांगितले. यावेळी सभापती रमजान तांबोळी यांनी प्रस्ताविक करताना सांगितले की ,कडा या ठिकाणी कांद्याची बाजार मोठा असून या ठिकाणी सहा देशांमध्ये कांदा निर्यात केला जातो .यापुढील काळातही कांद्याचे मार्केट करण्यासाठी तालुक्यामध्ये इतर ठिकाणी कांदा खरेदी सुरू करावी लागणार असल्याचे त्यांनी सांगितले .यावेळी केशव रसाळ ,विनायक देशमुख ,बाबासाहेब पिसोरे प्रियंका सावंत आदींनी विचार व्यक्त केले .बाजार समितीचे सचिव यांनी गळगटे यांनी सांगितले की बाजार समिती हा शेतकऱ्यांचा मुख्य घटक आहे त्यामुळेच या शेतकरी मेळाव्याचे आयोजन केले आहे. सध्या शासकीय हमीभावाने सोयाबीन उडीदाची खरेदी सुरू केली असून शेतकऱ्यांनी नोंदणी करण्याची आवाहन त्यांनी केले यापुढेही शेतकऱ्यांना उल्लेखनीय काम केल्याबद्दल मेळावा आयोजित करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी मनोज गाढवे,गंगाधर पडोळे,मुरलीधर फसले,योगेश भंडारी,सचिव हनुमंत गळगटे, उपसभापती रमेश तांदळे,अनिल ढोबळे,संजय ढोबळे, संजय मेहेर हेमंत शेठ पोखरना सय्यद अन्सार,, परिवंत गायकवाड, राम मधुरकर,अंकुश चव्हाण,शिवाजी अनारसे, बिपिन भंडारी,बबलू शेठ तांबोळी, विजय शेळके,श्याम तळेकर आदींसह कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक,मान्यवर, पदाधिकारी, पत्रकार परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकरी मेळाव्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला तब्बल तीन तास लोक कार्यक्रमात बसुन होती. झालेल्या प्रत्येक शेतकरी बांधवांनी येणाऱ्या काळात आम्हाला सुरेश धस सारख्या नेतृत्वाची गरज असल्याचे बोलून दाखवले.

------------

**टि.सी हरवला आहे**

अकबर हशमत पठाण या नावाचा १२ वी पास शाखा सायन्स आर्ट कॉमर्स आणि सायन्स कॉलेज अंबड ता.अंबड जि.जालना शहागड ते बीड दरम्यान एसटी प्रवासात हरवला आहे. ज्या कोणास आढळून आला तर योग्य बक्षिसे दिली जाईल.

**संपर्क::अकबर पठाण मो.क्रं ७०३८२८६५८९**

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार दि.१५ ऑक्टोबर २०२४


## प्रशासनाने उपोषणाची दखल घ्यावी –राजेंद्र मस्के

**बीड । प्रतिनिधी**

अहिल्यानगर बीड परळी रेल्वे मार्गावरील बीड रेल्वे स्थानकास भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यासाठी माजी सैनिक अनुरथ सोपान वीर यांचे गेली चार दिवसापासून जिल्हाधिकारी कार्यालया समोर तीव्र अन्नत्याग उपोषण चालू असून, त्यांनी जलत्यागही सुरु केला आहे. प्रशासनाने या आंदोलनाची तातडीने दखल घ्यावी. वीर यांना ठोस आश्वासन देऊन, उपोषण मागे घेण्यासाठी तातडीने प्रयत्न करावे असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

आज जिल्हाधिकारी कार्यलयासमोर माजी सैनिक अनुरथ वीर यांचे चालू असलेल्या उपोषण स्थळी राजेंद्र मस्के यांनी भेट देऊन प्रकृतीची चौकशी केली. यावेळी आंबेडकर चळवळीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

बीड जिल्हा हा मागास जिल्हा, गतिमान विकासासाठी रेल्वेची गरज असते. अहिल्यानगर बीड परळी हा रेल्वे मार्ग होण्यासाठी जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक, पत्रकार, तरुण युवक अशा विविध क्षेत्रातील अनेकांनी पुढाकार घेऊन, रेल्वे मंजुरीसाठी आंदोलने केली. जनतेची मागणी लक्षात घेऊन, स्व. गोपीनाथराव मुंडे यांनी रेल्वे मार्ग मंजुरीसाठी स्वत: पुढाकार घेतला. केंद्र व राज्य सरकारने संयुक्तिकपणे भरीव आर्थिक तरतूद केली. पुढे तत्कालीन खासदार प्रितमताई मुंडे यांनी भाजपा महायुती केंद्र सरकारकडे वेळोवेळी पाठपुरावा करून निधी आणला. अहिल्यानगर ते आष्टी रेल्वे मार्गाचे काम पूर्ण झाले असून, पुढील काम अंतिम टप्प्यात आहे.

# भ्रष्ट वारसदाराला हद्दपार करा –परमेश्वर मुंडे

## मतदार संघातील जनतेच्या ज्वलंत मागण्यासाठी परमेश्वर मुंडे यांच्या नेतृत्वात धडक मोर्चा

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव, धारूर, वडवणी या प्रत्येक तालुक्याला एक हजार कोटीचे पॅकेज देऊन पंचतारांकीत औधोगिक क्षेत्र निर्माण करून मोठ मोठे उद्योग आणण्यात यावे तसेच रामगीरी महाराज व नितेश राणे यांनी मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या प्रकरणी त्यांच्यावर गुन्हे दाखल करून त्यांना अटक करण्यात यावी, ओबीसी व मुस्लिम समाजाला लोकसभेत व विधानसभेत राजकीय आरक्षण देऊन एस.सी. एस.टी. च्या धरतीवर जागा आरक्षीत करण्यात याव्यात या मागण्यांसाठी दि. १४/१०/१०२४ रोजी राष्ट्रीय क्रांती सेनेचा उपविभागीय कार्यालय येथे धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चाचे नेतृत्व राष्ट्रीय क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष परमेश्वर मुंडे यांच्या नेतृत्वात काढण्यात आला या मोर्चास मतदारसंघातील हाजोरो लोक यावेळी मोर्चात उत्स्फूर्त सहभागी झाले होते या वेळी बोलताना परमेश्वर मुंडे महणाले येथील जनता विकास रोजगार मागते आमदाराने काय दिले वारसदार आमदाराच्या १५/२० टक्केवारी व भष्ट धोरना मुळे मंतदारसंघात प्रचंड भ्रष्टाचार मातला आहे मोठे ऊधोग आण्यात आमदार आफयशी ठरले मतदारसंघात उद्योग नसल्यामुळे येथील बेरोजगार तरुण नैराश्यात आणि व्यसनाधीन




ते कडे वळत आहे मतदारसंघातील दोन्ही सहकारी साखर कारखाने भ्रष्टाचाराचे कुरण आहेत या मतदारसंघातील इच्छुक उमेदवारांना कारखाना लुटण्याचे डुबवन्याचे आपल्याच शिक्षकाकडून वर्षातील दोन पगार घेऊन मौज मजा करून आमदार होण्याची स्वप्न पडत आहेत या महासयाच्या शिक्षण संस्थेत विद्यार्थी काय शिक्षण घेत असतील तर काहींना बँक लुटण्याचे एक्सपीरियंस आहेत अस्य ऊमेदवाराना मंतदारानी दारात सुध्धा ऊभा करु नाही असे

आवाहन त्यांनी केले.

माजलगाव मतदार संघा मध्ये पंचतारीकी औद्योगिक क्षेत्र निर्माण करण्यासाठी मोठ मोठे उद्योग आणण्यासाठी या सरकारचे लज्ञ वेदनासाठी या मोर्चाचे आयोजन केले आहे असेही ते म्हणाले .येथील सुशिक्षित बेरोजगार, ऊसतोड कामगारांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध होईल. व येथील सुशिक्षित बेरोजगारांचे व ऊसतोड मजुरांचे पर जिल्ह्यात परराज्यात स्थलांतर होणार नाही. यासाठी राष्ट्रीय क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष परमेश्वर मुंडे सरकारने विशेष पॅकेज द्यावे अशी मागणी यावेळी बोलताना मुंडे यांनी माजलगाव मतदारसंघा मध्ये सुशिक्षित बेरोजगारांच्या हाताला काम नसल्यामुळे बेरोजगार तरुणांची फार मोठ्या प्रमाणात संख्या वाढत चालली आहे. माजलगाव मतदारसंघात अंदाजे दीड लाख ते एक लाख सत्तर हजार लोक ऊस तोडणीसाठी पश्चिम महाराष्ट्र, कर्नाटक राज्यासह इतर राज्यामध्ये स्थालांतरीत होतात. तसेच येथील बेरोजगारांना टेकनिकल कुशल कारागीर आणि अकुशल कारागीर यांना पुणे मुंबई नाशिक औरंगाबाद ,याठिकाणी पोटाचाउदारगिवाह करण्यासाठी कामाला जावे लागत आहे. माजलगाव मतदारसंघात औरंगाबाद सारखी पंचतारांकीत औद्योगगक क्षेत्र निर्माण करण्याची गरज आहे. प्रत्येक तालुक्यामध्ये औद्योगगक क्षेत्र निर्माण करण्यात

यावे.माजलगाव मतदारसंघात स्थायिक उद्योजकांना ५०% उद्योग निर्माण करण्यासाठी अनुदान देण्यात यावे. बाहेरून येणाऱ्या उद्योजकांसाठी विज, जी.एस.टी., इन्कम टॅक्स मध्ये सूट देण्यात यावी कमी दरात त्यांना औद्योगिक क्षेत्रातील जमीन उपलब्ध करून देण्यात यावी. त्यामळे मोठे उद्योजक येथे आकर्षित होतील, स्थागिक उद्योजकांना उद्योग उभारण्यासाठी प्रशिक्षण फ्री मध्ये उपलब्ध करूण देण्यात यावे. मुस्लिम ओ.बी.सी. समाजाला विधानसभा व लोकसभा एस.सी.एस.टी. च्या धरतीवर राजकीय आरक्षण देऊन लोकसंखे नुसार लोकसभा व विधानसभे मध्ये जागा आरक्षित करण्यात याव्यात.तसेच माजलगाव मतदारसंघात तिन्ही तालुक्याला प्रत्येकी एक एक हजार कोटीचेपॅके देण्यात यावे. टोटल मतदारसंघात तीन हजार कोटीचेपॅकेज राज्य व कें द्र सरकारने द्यावे. वरील मागण्यांचा सकारात्मक विचार सरकारने करणे, अत्यंत गरजेचे आहे. जिल्ह्यातील वाढत चाललेली गुन्हेगारी बेरोजगारी, मागासलेपणा, आत्महत्येचे वाढलेलेप्रमाण कमी करण्यासाठी जिल्हा पूर्णतः हा शेतीवर अवलंबून असल्यामुळे औद्योगगक क्षेत्र निर्माण केल्यास त्याचा मोठा फायदा शेतकरी व तरुण बेरोजगार टेक्निकल कुशल अकुशल कामगार स्थानिक उद्योजक यांना होणार आहे. येथील बोरोजगार तरुन ऊसतोड मजुर देशोधडीला लागेल मागण्यांचा सकारात्मक विचार करावा हि सरकारला विनती येथील इंजिनियर कुशल अकुशल ऊसतोड मजूर यांना स्थानिक पातळीवर रोजगार देण्याचे सरकारकडे कुठले धोरण उपलब्ध आहे हे सरकारने सांगावे नितेश राणे व रामगिरी यांच्यावर मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या प्रकरणे गुन्हा दाखल होऊन त्यांना अटक झालीच पाहिजे आशी माग्नी त्यानी केली दि.१४/१०/२०२४ रोजी सकाळी ११:०० वा. आंबेडकर चौक ते माजलगाव तहसील कार्यालयावर हा मोर्चा काढण्यात आला या वेळी तरुनानी घोषणांनी हा परिसर दुमदुमून गेला होता राष्ट्रीय क्रांती सेनेचच्या वतीने संस्थापक अध्यक्ष परमेश्वर मुंडे, शेख यावर जिबरान,शेख खाजा, रिहान चोधरी,रवी देशमुख,श्रीराम मुंडे,दत्ता नागरगोजे, सुहास मुंडे, नितीन मुंडे, संतोष नागरगोजे, अण्णा मायकर भागवत मुंडे, उपस्थितांचे आभार मानले.

## मातकुळी जि.प.शाळेतील जेष्ठ शिक्षक महाव्दार यांचा वाढदिवस ग्रामस्थांकडून मोठ्या उत्साहात साजरा

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

गुरू सेवा, गुरू भक्ती, गुरू प्रेम पाहिजे मनात. गुरू शिवाय नाही किमंत मानवा तुला जीवनात या गुरूविषयी असलेल्या अतुट गुरूप्रेमाविषयी गिता प्रमाणे तालुक्यातील मातकुळी येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत ग्रामस्थांकडून येथील शाळेतील शिक्षकांचा व विद्यार्थ्यांचाही वाढदिवस केला जात असून त्याचे कौतुकही होतांना पहावयास मिळत आहे.

सोमवार दिनांक १४/१०/२०२४ रोजी आष्टी तालुक्यातील नामवंत शिक्षणप्रिय केंद्रीय प्राथमिक शाळा म्हणून ओळख असलेल्या मातकुळी येथील शाळेचे गुणवंत व विद्यार्थीप्रिय सहशिक्षक विजय



महाव्दार सर यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात विद्यार्थी व पालक वर्गाकडून साजरा करण्यात आला यावेळी शाळेतील कुमारी श्रध्दा कैलास पाचबैल, कु. राधा शेळके, कु. वैष्णवी डोके, यश आढाव, विद्यार्थ्यांचाही वाढदिवस साजरा करण्यात आला. तसेच शाळेत नवीनच रुजू झालेले सहशिक्षक भोसले सर यांचेही ग्रामस्थांकडून स्वागत करण्यात आले. यावेळी सत्काराला उत्तर देताना जेष्ठ शिक्षक विजय महाव्दार सर मनाले की, विद्यार्थी आणि पालकांनी माझ्या वाढदिवसानिमित्त केलेला सत्कार माझ्या जीवनातील मोठा मानसन्मान समजेन व विद्यार्थी आणि पालकांचा कायम स्नेही राहील. यावेळी कार्यक्रमाला कडा कारखान्याचे माजी संचालक सुधाकर डोके शालेय शिक्षण समितीचे सदस्य भरत डोके, रविदादा पाटील, पत्रकार गहिनीनाथ पाचबैल, शिक्षणप्रेमी पालक बंकट आबा पाचबैल,पप्पू पाचबैल, भाऊसाहेब जरे, बाबु वीर, विठ्ठल आप्पा समुद्रे शाळेचे मुख्याध्यापक सुर्यभान पठाडे, सहशिक्षक सिताराम माने, नागरगोजे सर, मधुकर गळगटे, खेमगर सर, श्रीमती डमाळे मॅडम, श्रीमती मनीषा इंगळे मॅडम अंगणवाडी सेविका पवार मॅडम, भाग्यश्री सोनवणे आदी शिक्षणप्रेमी ग्रामस्थ उपस्थित होते.

## बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी महाराष्ट्रात १५० जागा लढविणार –ॲड. सुरेश माने

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी महाराष्ट्रात १५० जागा लढविणार आहे अशी माहिती बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष ॲड.(डॉ.) सुरेश माने यांनी सोमवार, दिनांक १४ ऑक्टोबर रोजी दिली आहे.

प्रसिद्धीसाठी दिलेल्या पत्रकात ॲड.(डॉ.) सुरेश माने यांनी नमूद केले आहे की, आगामी विधानसभा निवडणूक संदर्भात राज्यातील महाविकास आघाडी पक्ष व नेते यांच्या ताठर व स्वयंकेंद्रित भुमिकेमुळे राज्यात कोणत्याही परिस्थितीत भाजपाला व पर्यायाने संघिय विचारसरणीला सत्तेत स्थान मिळू द्यायचे नाही अशी वैचारिक व संघर्षात्मक भूमिका असून देखील राज्यात काँग्रेस – राष्ट्रवादी (पवार) व उबाठा यांच्या नकारात्मक भुमिकेमुळे अनेक आंबेडकरवादी, समाजवादी व डाव्या पक्षांची कुचंबना होत असून त्यांचे स्वतंत्र व धोरणात्मक राजकारण हे संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे. मात्र सत्तेचे सोपान सोपे व्हावे याचसाठी काँग्रेस, राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) किंवा उबाठा मध्ये जी भाजपा किंवा शिंदे शिवसेना–राष्ट्रवादी (अजित पवार) यांच्या पक्षातून जी आयात होत आहे. ती म्हणजे ज्यांनी आजपर्यंत भाजपाचे राजकारण जिवंत ठेवले त्यांना जिवंत करणे होय हे म्हणजे कालपर्यंतच्या भाजपातील नेत्यांचे महाविकास आघाडी तर्फे पुनर्वसन होय, मग जे कालपर्यंत भाजपात जातीयवादी म्हणून ओळखले गेले ते महाविकास आघाडीत पुरोगामी कसे ठरतात हा खरा सवाल आहेच, परंतू यातून राज्यात कोणत्याही परिस्थितीत महायुती व महाविकास आघाडी दोन्हीचे सत्ता हेच ध्येय असून वैचारिक संघर्ष किंवा धर्मनिरपेक्षतेचे राजकारण म्हणजे चेहरा झाकण्यासाठी वापरलेला बुरखाच वाटतो ही बाब अत्यंत निषेधार्ह होय. महाराष्ट्रातील प्रस्थापित पक्षांना राज्यातील आंबेडकरी, डावे, समाजवादी पक्षांचे राजकारणच मुळी नकोसे आहे. मात्र काँग्रेस भाजपा व्यतिरिक्त स्वतंत्र बाण्याचे फुले – शाहू – आंबेडकरी परिवर्तनाचे राजकारण महाराष्ट्रामध्ये मजबूत झालेच पाहीजे ही आमची ठाम भुमिका आहे आणि याच भूमिकेतून महाराष्ट्रात बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीने स्वबळावर १५० विधानसभा जागांवर लढण्याचे निश्चित केले असून इतरही फुले–आंबेडकरी, डावे व समाजवादी पक्षांचे सहकार्य घेणे व त्यांना देणे या दोन्ही बाबींचा निर्णय राज्याच्या प्रमुख पदाधिकारी यांच्या नागपूर व मुंबईत संपन्न झालेल्या बैठकीत नुकताच घेण्यात आलेला आहे. याशिवाय राज्यात संविधानात्मक आरक्षणाचे राजकारण करून राज्यातील जाती–धर्मात वैमनस्य निर्माण करणारे राजकारण, राजकारणी व त्यांचे पक्ष यांचेही या निवडणूकीत सुज्ञ जनतेने पानिपत करावे असे पक्षातर्फे ठराव करण्यात आलेला आहे. राज्याचा समतोल विकास, शोषणमुक्त समाज, भुमिहिनांना जमीन वाटप, प्रत्येक कुटूंबात कमीत कमी एक सरकारी नौकरी, अतिमागास समाजघटकांना विशेष घटक योजना, शेतक–यांना मोफत विज, पेन्शन योजना, सरकारी नौकर भरती, पदोन्नती आरक्षण, ओबीसी जनगणना, आदिवासींच्या डिलीस्टींगला विरोध अशा अनेकविध महत्वपूर्ण मुद्यांवर राज्यात बीआरएसपी निवडणूक लढविणार आहे आणि याबाबत पक्षातर्फे लवकरच निवडणूक जाहीरनामा प्रकाशित करण्यात येणार आहे.

पान ६ वरून...

### राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन कार्याशी निगडित विविध उपक्रमांचे आयोजन महाविद्यालय करत आहे. हे या वक्तृत्व स्पर्धेचे ५४ वे वर्ष आहे. या स्पर्धेसाठी जास्तीत जास्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन संयोजक तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी यांनी केले आहे. स्पर्धेचे विषय पुढीलप्रमाणे आहेत. १) असे आम्हाला हिंदुत्वाचा सार्थ असा अभिमान, २) निर्भय होऊ आम्ही, जगाला निर्भयता शिकवू, ३) कुटुंब हेच संस्काराचे प्रथम केंद्र, ४) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा सांस्कृतिक राष्ट्रवाद, ५) समाज स्वास्थ्य बिघडविणारी समाज माध्यमे..! या स्पर्धेचे माध्यम मराठी असेल. पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभाग घेता येणार नाही. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या महाविद्यालयांनी वरिष्ठ आणि कनिष्ठ गटातून प्रत्येकी दोन विद्यार्थ्यांचा संघ पाठवावा. सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येईल. स्पर्धेचे सांघिक शुल्क १०० /– रूपये असेल. सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या संघाची नोंदणी . या ई–मेलवर करावी. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांना संलग्न असलेली वरिष्ठ महाविद्यालये, कनिष्ठ महाविद्यालये तसेच माध्यमिक विद्यालयांना जोडून असलेल्या उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना या स्पर्धेत भाग घेता येईल. स्पर्धा बुधवार दि.१६ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी दहा वाजता स्व.गोपीनाथराव मुंडे सभागृहात सुरू होईल. सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या संघाला फिरता स्मृती चषक देण्यात येईल. हा फिरता स्मृती चषक संबंधित महाविद्यालयाकडे एक वर्ष राहील. स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांची तसेच त्यांच्या समवेत आलेल्या प्राध्यापक किंवा प्रशिक्षकांची देखील भोजनाची व्यवस्था महाविद्यालयात करण्यात आलेली आहे. तसेच प्रथम पारितोषिक – रूपये ७००१/– व सन्मानचिन्ह, द्वितीय पारितोषिक – रूपये ५००१/– व सन्मानचिन्ह, तृतीय पारितोषिक – रूपये ३००१/– व सन्मानचिन्ह आणि उत्तेजनार्थ दोन पारितोषिके प्रत्येकी रूपये ११०१/– व सन्मानचिन्ह असे पारितोषिकांचे स्वरूप आहे. विद्यार्थ्यांनी आपली नोंदणी स्पर्धा प्रमुख प्रा.योगेश कुलकर्णी (भ्रमणध्वनी क्रमांक – ९४०३०३७०११) तसेच स्पर्धा सहप्रमुख प्रा.तुळशीराम मुंढे (भ्रमणध्वनी क्रमांक – ८६९८७९५४११) यांच्याकडे करावी असे आवाहन स्व.नाना पालकर स्मृती राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे संयोजक तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी यांनी केले आहे.

### लोणी येथील असंख्य

माध्यमातून सर्वसामान्यांच्या विकासांत आपण भरीव कार्य कराल व पक्ष संघटना अधिक मजबुतीने उभी कराल ही अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष जिवनराव देशमुख, भटक्या विमुक्त सेल अध्यक्ष गणेश देवकते, मुक्ताराम गवळी आदी उपस्थितीत होते.

## हनुमान नगर नवरात्र दांडिया अंतिम फेरीतील विजेत्यांना माजी आमदार संगिताताई ठोंबरे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

नुकत्याच झालेल्या हनुमान नगर नवरात्र दांडिया अंतिम फेरीतील १२ विजेतेपद पटकावणारया विजेत्यांना माजी आमदार सौ.संगिताताई ठोंबरे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.यावेळी व्यासपीठावर युवा नेते दिपक भैय्या शिंदे,मा.नगरसेवक दिलीप काळे सह आदी प्रमुख पाहुणे उपस्थित होते.*

यावेळी बोलताना त्यांनी छत्रपती गणेश मंडळ आयोजित हनुमान नगर नवरात्र दांडिया उत्सव समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले व ८१ महिलेंच्या सन्मान उपक्रमास शुभेच्छाही देत पुढील वर्षांत असाच उपक्रम राबविण्यात यावा असे मत व्यक्त केले.नवरात्र दांडिया चे हे प्रथम वर्ष आहे.या दांडिया उत्सवाचे अध्यक्ष बालाजी खैरमोडे यांनी अथक परिश्रम घेत हनुमान नगर, हावळे गल्ली नव्हे तर अंबाजोगाईच्या पंचक्रोशीत एक उत्तम उदाहरण देऊन महिलेंचा सन्मान कसा करायचा असतो ते दाखवून दिले.संपूर्ण ९ दिवस महिला वर्गाला सन्मान देण्याचे काम त्यांच्या सोबत असलेले चेतन रामरूले,संतोष बिचकुले,संजय सुर्यवंशी,रवि लाड,दत्ता पवार, मुन्ना लोहार,विठ्ठल गुळभिले,अक्षय कदम, अभिषेक पाटील, शंकर भिसे,योगेश पिंगळे, शुभम काचरे,उत्तम हुलगुंडे,सदगूरू शितोळे,राजेश भिसे,कांबळे, शिवम चव्हाण,पप्पू हावळे आदींनी प्रचंड मेहनत घेवून सुंदर असा उत्सव साजरा केला,असे मत व्यक्त केले.यावेळी माजी आमदार सौ.संगिताताई ठोंबरे यांचा सत्कार सर्व प्रथम सौ.राजश्री पाटील,सौ.शिल्पा गंभीरे,सौ.मनिषा सुर्यवंशी,सौ.आशा



खैरमोडे,सौ.महानंदा रामरूले,सौ.दिपाली हावळे,सौ.संगीता कदम, सौ.भारती लखेरा,सौ.रेखा रेणापूरे यांच्या हस्ते करण्यात आला तर उत्स्फूर्त स्वागत सौ.वर्षा रामरूले,सौ.सुवर्णा खैरमोडे,सौ.भाग्यश्री बिचकुले,सौ.वंदना आपेट,सौ.सुवर्ण माला केंद्रे,सौ.साधना रेणापूरे,सौ.संगीता काचरे,सौ.महानंदा शितोळे,सौ.पूजा शर्मा यांनी केले.

अंतिम फेरीत पर्यवेक्षक म्हणून संतोष मोहिते,नितिन पराधिया यांनी काम पाहिले.

यामध्ये महिला वर्गांतून तब्बल ७ पारितोषिक काढण्यात आले.उत्तेजनार्थ नंबर (२६,८१,१३,१६) चार काढण्यात आले.तर तृतीय (३३),व्दितीय (१३६),प्रथम (०५) *अनुक्रमे एक असे क्रमांक काढण्यात आले.तर पुरूष गटातील प्रथम (०४),व्दितीय (९९),तृतीय (५३),उत्तेजनार्थ (०१),उत्तेजनार्थ (१०८) अशा सर्व विजेतेपद पटकावणाऱ्या विजेत्यांना पारितोषिक देण्यात आली.पारितोषिक चे सौजन्य लोकमान्य नागरी सहकारी बँक चे संस्थापक दत्तात्रय कदम व सौ.संगिता कदम यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. दरम्यान, गेल्या ९ दिवसात दांडिया मंडपात उत्कृष्ट रांगोळी काढणे असो वा स्वच्छतेचे काम असो,साहित्याची ने आण,छोट्या मोठ्या महिलांना दांडिया शिकवणे व इतर कारय करणारया प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य करणारया रवि लाड, हर्षल लखेरा,शंकर गाढवे ,मुन्ना लोहार,साखरे,सौ.पूजा शर्मा यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.तसेच दररोज ६ पारितोषिक ठेवण्यात आले होते ९ दिवसातील एकूण ५४ विजेत्यांना शिल्डचे वितरण करण्यात आले.यावेळी व्यासपीठावर बालाजी खैरमोडे,संजय गंभीरे,संजय सुर्यवंशी, चेतन रामरूले,संतोष बिचकुले,अक्षय कदम,अभिषेक पाटील,शंकर भिसे आदींच्या हस्ते शिल्डचे वितरण करण्यात आले. सदरील शिल्ड संजय गंभीरे यांच्या सौजन्याने देण्यात आले तर सहभाग प्रमाण पत्र बालाजी खैरमोडे यांच्या हस्ते वितरण करण्यात आले.सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आकाश भिसे,अमोल खैरमोडे,बालाजी गोडसे,विशाल मुंदडा,देविदास खैरमोडे,दिपक रेणापुरे,शुभम खरात,सचिन भिसे शितल शर्मा,विष्णू शर्मा,सिध्दाजी पवार, सुधाकर काचरे,रूद्र शर्मा, ऋषीकेश राऊत, अविष्कार खैरमोडे,लखन शिंदे,हितेश डिडवाणी,उत्तम हुलगंडे,धनंजय हावळे,शंकर ठाकुर,गोविंद डबरे,अतुल हावळे,मयुर सुर्यवंशी,अक्षय हावळे,निखिल खरात,अभय हावळे,धिरज काटे,राजेश भिसे आदींनी प्रचंड मेहनत घेतली.

पान ६ वरून...

### श्री श्री रविशंकर विद्या मंदिर

कुमारिकांचे पाद्यपूजन करून त्यांची ओटी भरून त्यांना भेटवस्तू देण्यात आली. विद्यार्थ्यांचा फुलांचे हार बनविण्याचा उपक्रम घेण्यात आला.शाळेच्या उपमुख्याध्यापिका अनिता सूर्यवंशी मॅडम यांनी यावेळी यांनी देखील यावेळी मार्गदर्शन केले तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूजा लांडे मॅडम यांनी केले तर गरबा नृत्याचे मार्गदर्शन नृत्य शिक्षक किरण राठोड सर यांनी केले.

### आज होणाऱ्या नऊगण यात्रेस

त्यानंतर अवघ्या तीन दिवसांमध्ये नवगण यात्रा संपन्न होते. या यात्रेसाठी श्रीक्षेत्र कपिलाधार (बीड) ते श्रीक्षेत्र नागनाथ मानूर पदयात्रा व श्री दत्त मंदिर करंजी (ता.आष्टी) ते श्रीक्षेत्र नागनाथ मानूर पदयात्रा अशा दोन पदयात्रा या गणयात्रेनिमित्त येणार आहेत. पदयात्रेमध्ये असंख्य शिष्य सदभक्त हे पायी चालत मानूर नागनाथ येथे येणार आहेत. श्री तीर्थक्षेत्र नागनाथ देवस्थान मानूर या ठिकाणी संपन्न होणारी ही नवगण यात्रा ही नागेश संप्रदायाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची गण यात्रा असून या यात्रेस अनन्यसाधारण महत्त्व सांप्रदायिक दृष्ट्या आहे. त्याचबरोबर मानूर येथे संपन्न होणारी गण यात्रा ही नागेश सांप्रदायाची सर्वात शेवटची यात्रा आहे. म्हणजेच या यात्रेनंतर नागनाथ महाराजांची यात्रा ही कोठेही होत नाही याचे कारण म्हणजेच नागेश सांप्रदायाचे मूळ हे मानूर या ठिकाणी आहे आणि नागनाथ महाराज यांचे उगमस्थान म्हणून नागतळा आहे. तरी सर्व शिष्य सदभक्त मंडळी व नागनाथ भक्तांना आवाहन करण्यात येत आहे की, या नऊगणयात्रेसाठी वार मंगळवार दि.१५ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी ३ पर्यंत आपण सर्वांनी उपस्थित राहून या गणयात्रेचे गुह्य गुपित समजून घ्यावे व नागनाथ महाराज यांचा कृपाशीर्वाद प्राप्त करून घ्यावा. असे आवाहन श्री नागनाथ देवस्थान जहागीरदार मठसंस्थान मानूरच्या वतीने करण्यात आले आहे.

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

मंचावर होती.पुढे बोलताना डॉ.गडदे यांनी अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन आणि कार्य याविषयी सविस्तर माहिती दिली. अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य हे प्रेरणादायी आहे. विद्यार्थ्यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याची संदर्भ पुस्तक वाचली पाहिजेत असेही त्यांनी आवाहन केले.तसेच खोलेश्वर महाविद्यालयाने आयोजित केलेल्या या उपक्रमाचे कौतुक देखील केले. अध्यक्षीय समारोपामध्ये ज्योतीताई ठाकूर यांनी अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य विद्यार्थ्यांना प्रेरक आहे. विद्यार्थ्यांनी अहिल्यादेवी यांच्या कार्याचा संदर्भ ग्रंथाचा अभ्यास केला पाहिजे असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पाडेकर यांनी केले तर आभार केंद्रीय कार्यकारिणी सदस्य वर्षाताई मुंडे यांनी मानले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रोहिणी अंकुश यांनी केले. यावेळी अहिल्यादेवी यांच्या जीवन कार्यावर केलेल्या हस्तलिखिताचे व बी.ए. प्रथम वर्षाची विद्यार्थिनी कु.ऋतुजा चाटे हिने रेखाटलेल्या अहिल्यादेवी होळकरांच्या चित्राचे विमोचन करण्यात आले तसेच शारदोत्सवाच्या निमित्त घेण्यात आलेल्या रांगोळी स्पर्धेचे बक्षीस वितरणही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### पोलिस कर्मचाऱ्यांना आवश्यक

अवस्था अत्यंत जीर्ण झाली असल्याचे आ. कैलास गोरंटयाल यांच्या निदर्शनास आणून देत निवासस्थानाचे छताचे प्लास्टर पडले, भिंती कोसळल्या असून सिमेंटची पत्रे कुजली, सांडपाणी व्यवस्था सतर वर्षे जुनी असल्याने कुचकामी ठरली आहे.सदर वसाहत परिसरात ज्या चार उभारण्यात आल्या आहेत. तेथील सांडपाण्याचा प्रश्न देखील गंभीर आहे. इमारतीच्या भिंतीवर झाडे उगवली असून इमारतीस कमकुवत करत आहेत. मात्र, या सर्व समस्यांना तोंड देत पोलीस कर्मचारी या वसाहतीमध्ये अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये राहत असल्याचे पोलिस मित्र युवा महासंघाच्या शिष्टमंडळाने सांगितले. पोलीस वसाहतीचे जुने बांधकाम पाडून तेथे आवश्यक त्या सुविधांसह नवीन इमारत बांधकाम करण्यात यावे.जालना शहरातील सदर बाजार पोलीस ठाणे हे मध्यवती ठिकाणी असून या ठाण्याला चार पोलीस चोकी संलग्नित आहेत. या पोलीस ठाण्या अंतर्गत असलेली लोकसंख्या सुमारे दोन ते अडीच लाख इतकी आहे. शहरातील सर्वसामान्य जनता आपले प्रश्न घेऊन पोलीस स्टेशनमध्ये येत असतात परंतु जागेच्या अभावामुळे पार्किंगची समस्या निर्माण होते.पोलीस ठाण्यात असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या व पोलीस ठाण्या अंतर्गत दाखल गुन्ह्यांच्या संख्येचा गांभीर्याने विचार करून सदर बाजार पोलीस ठाण्याच्या जुन्या वास्तूच्या जागी नवीन इमारतीचे बांधकाम करावे, यासोबतच औद्योगिक प्रशिक्षण संस्था परिसरामध्ये पोलीस ठाण्याला नवीन जागा उपलब्ध करून तेथे पोलिसांसाठी नवीन इमारतीचे निर्माण करावे, अशी मागणीही य शिष्टमंडळाने आ. कैलास गोरंटयाल यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली.

### माधव निर्मळ यांच्या गाव

त्यांना पाठिंबा मिळत असल्याने विरोधकांचे धाबे दणाणले आहे.

माजलगाव विधानसभा मतदारसंघातील देवदहिफळ ता.धारुर येथे गांवकरी यांच्याशी संवाद साधला व येणाऱ्या विधानसभा या निवडणूकीमध्ये मला आशीर्वाद देऊन आपली सेवा करण्याची संधी द्यावी असे आवाहन केले. यावेळी उपस्थित माजी पंचायत सभापती नरहारी दादा बडे, सरपंच श्रीधर बडे,सरपंच महादेवराव नाना केकाण, सरपंच शिवाजी काळे, युवा नेते राज भैय्या बडे,मा.उपसरपंच दिलीपराव बडे,अहमदभाई पटेल, युवा नेते रंजीतभैय्या रुपनर ,पं.स.सदस्य देवराव कोल्हे, बाबुराव बडे,गोतम तोंडे, माणिकराव बडे मधुकर आंधळे, केशव कोल्हे,अंगदराव राख, दामोधर आण्णा बडे बळीराम राख, वसंतराव तोंडे ,संगम चे उपसरपंच बळीराम डापकर ,नयुम भाई शेख,दत्ता गोंदणे अशोकराव आंधळे राधाकिशन बडे, शिवराज शेप बबनराव कांदे,शेख युनुस भाई,शेख रफीक भाई, बळीराम आंधळे,युवा नेते रघुनाथ बडे, नागनाथराव शेपयुवा नेते विकास बडे, अंगदराव वड्डे, डॉ शेप,शंकर चौरे विठ्ठल राख,नितीन वड्डे,यांच्या सह आदी पदाधिकारी कार्यकर्ते गावकरी युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्य लोकतंत्र
# शेत-शिवार
मंगळवार दि.१५ ऑक्टोबर २०२४ ४

# धान उत्पादक शेतकऱ्यांसाठी हेक्टरी २५ हजार रुपये बोनस देऊ

## फडणवीसांची ग्वाही



मुंबई : राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धान उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी २५ हजार रुपये बोनस देण्यासाठी प्रयत्न करू, असे आशवासन दिले आहे. तर या बोनससाठी आपण धान उत्पादक शेतकऱ्यांचे वकील होऊ, असेही आश्वासन गोंदिया-भंडारा जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना दिले आहे. ते गोंदिया येथे धापेवाडा योजनेच्या टप्पा २ व ३ चे भुमिपूजन आणि दुरुस्त झालेल्या वितरिकेचे लोकार्पण सोहळ्यावेळी बोलत होते.

लोकसभा निवडणुकीनंतर आता राज्यात विधानसभा निवडणुकांचे पडघम वाजण्यास सुरूवात झाली आहे. कोणत्याही क्षणी आचरसंहीता लागण्याची शक्यता आहे. यामुळे महायुती सरकारकडून निर्णय घेण्याचा आणि कॅबिनेट बैठकींचा सपाटा सुरू आहे. यादरम्यान धापेवाडा योजनेच्या टप्पा २ व ३ चे भुमिपूजन आणि दुरुस्त झालेल्या वितरिकेचे लोकार्पण सोहळ्यावेळी फडणवीस यांनी महाविकास आघाडीवर जोरदार निशाना साधत टीका केली. फडणवीस यांनी, मविआ सरकारच्या काळात धानाला बोनस घोषित करण्यात आले. मात्र ते शेतकऱ्यांच्या पदरात पडलेच नाही. पण आमचे सरकार आले आणि आम्ही धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस दिला असा दावा केला आहे. याआधी धानाच्या बोनसची केवळ आश्वासणे दिली गेली. पण आम्ही शेतकर्यांना आधी १५ हजार नंतर २० हजार धानाला बोनस दिला. आता तिरोड्यातील शेतकऱ्यांची मागणी धानास २५ हजार बोनस देण्याची होत आहे. ती ही लवकरच मान्य करू असे आश्वासन फडणवीस यांनी यावेळी दिले. तसेच या मागणीसाठी आपण शेतकऱ्यांचा वकील म्हणून मुख्यमंत्र्यांकडे जाऊ. शेतकऱ्यांची मागणी पूर्ण करून घेऊ, असेही फडणवीस यांनी म्हटलं आहे. फडणवीस यांच्या या घोषणेनंतर धान उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. तसेच यावेळी फडणवीस यांनी धापेवाडा उपसा सिंचन योजनेअंतर्गत एकूण ५ हजार २१७ कोटींच्या विकासकामांना तसेच नगर परिषद क्षेत्रातील २०५ कोटींच्या विकासकामांना मान्यता दिल्याचे सांगितले. तर या सिंचन योजनेमुळे येथील २ लाख लाख एकर जमीन ओलीताखाली येण्यास मदत होईल, असेही फडणवीस यांनी म्हटले आहे. फडणवीस यांनी केलेल्या घोषणेमुळे सध्या राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. याचा लाभ गोंदिया-भंडारासह पूर्व विदर्भातील आणि कोकणपट्ट्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना मिळेल.

# रब्बी हंगामातील भेंडी लागवड; जाणून घ्या संपूर्ण माहिती



रब्बी हंगाम सुरू होणार आहे. या हंगामात शेतकरी बराच भाजीपाला लागवड करतात. या पिकामध्ये भेंडी ही मुख्य भाजी मानली जाते. याची देशभरात मोठी मागणी आहे. भेंडी लागवडीपासून शेतकरी एका हंगामात चांगले उत्पन्न मिळवू शकतात.

रब्बी भेंडी : या हंगामात भेंडीची लागवड केल्याने भेंडीचे झाड लहान राहते आणि जलद उत्पन्न देते.

प्रगत वाण : परभणी क्रांती, पुसा सावनी, पंजाब पद्मिनी, पूजा ए -४, आर्का भय, अर्का अनामिका, पंजाब -७, पंजाब -१३ भेंडी.

योग्य जमीन : भेंडीची लागवड सर्व प्रकारच्या मातीमध्ये करता येते, परंतु चिकणमाती, बाळूई चिकणमाती आणि मटियार लोम माती अधिक उत्पादनासाठी योग्य मानली जातात.

बियाणे प्रक्रिया : यासाठी बिया २४ ते ३६ तास पाण्यात भिजत ठेवल्या जातात. यानंतर त्या सावलीच्या जागी सुकत ठेवा. बियाणे पेरण्यापूर्वी कोणत्याही बुरशीनाशकात प्रति किलो २ ग्रॅम दराने चांगले मिसळावे.

बियाण्याचे प्रमाण : उन्हाळी हंगामात भेंडीच्या लागवडीसाठी २० किलो तर पावसाळ्याच्या लागवडीसाठी प्रति हेक्टरी १२ किलो बियाणे आवश्यक आहे.

पेरणीची पद्धत : भेंडी पेरताना एका रांगेपासून दुसऱ्या रांगेचे अंतर ३० सेमी आणि एका रोपांचे ते दुसऱ्या रोपाचे अंतर १२ ते १५ सें.मी. असावे.

सिंचन : संपूर्ण शेताला योग्य आकाराच्या पट्ट्यामध्ये विभागून घ्या जेणेकरून सिंचनामध्ये सोयीचे होईल. पावसाळ्यात पाणी साचू नये म्हणून भेंडीची पेरणी उंच बेडमध्ये करावी.

कापणी : सुमारे अडीच महिन्यांनी पीक कापणीसाठी तयार होते. तोडणीनंतर ३ ते ५ दिवस भेंडी खाण्यायोग्य असते, तर पुसा सावनी ह्या प्रकारात हा कालावधी ७ दिवस असतो.उत्पादन : योग्य तंत्राने भेंडीची लागवड केल्यास प्रति हेक्टरी ११५ ते १२५ क्विंटल उत्पादन मिळू शकते. शेतकरी बांधवांना यातून चांगले उत्पन्न मिळू शकते.

# झिनिया :एक चांगला उत्पन्न देणारा फूलशेती पर्याय

झिनियाचे फुल म्हटले की, आपल्या डोळ्यासमोर येतात ती रंगबिरंगी नाजूक फुले. झिनीयाचे फुल हे खुप आकर्षक असते. विविध रंगातील टपोरे झिनिया हे अनेकांचे आवडते फुल असते. हे नेहमी आपल्याला घरासमोर कुंडीत, बगिचेमध्ये दिसत असते पण या फुलांची लागवड ही फार कमी प्रमाणात व्यापारी तत्वावर केली जाते. पण आपण कधी विचार केला आहे का की, या फुलांची लागवड कुठे आणि कशी होते ते? चला तर मग जाणून घेऊया झिनीया लागवडीबद्दल.

मेक्सिको हे या फुलाचे उगमस्थान जरी असले तरी, त्याची लागवड भारतात फार वर्षपासून सूरु झाली आहे. मेक्सिकोमधून मग ह्या फुलाचा प्रसार हा अमेरिका आणि इतर देशांमध्ये झाला. या फुलाच्या लागवडीसाठी उष्ण आणि दमट हवामान लागते. खूप जास्त थंडी ह्या झाडाला मानवत नाही. या फुलांसाठी



जमीन ही मध्यम काळी ते भारी काळी जमीन लागते. पण मुरमाड जमिनीत जर चांगल्या प्रकारे शेणखत वगैरे टाकले तर तेथेही याचे उत्पादन येऊ शकते.

झिनिया फुलाच्या उन्नत जाती : १) झिनिया लिनीओरिसा(बटन झिनिया), २)झिनिया इलेगनस(गेंदा झिनिया), ३)झिनिया हजेना (बुटका झिनिया)

लागवड :लागवड करताना दोन रोपांमधील व दोन ओळींमधील अंतर हे ४५ बाय ४५ सेंटीमीटर असे असावे. गादीवाफ्यावरील रोपांची वाढ १५ सेंटीमिटर किंवा जास्त झाली असली तर लागवडीच्या वेळी रोपांचे शेंडे खुडून रोपे लावावीत. यामुळे फुलांचा बहर चांगला येतो. या फुलांच्या झाडाच्या लागवडीसाठी जवळच्या कृषी केंद्रावर रोपे उपलब्ध होऊ शकतील. यामुळे फुलांची शेती करत असाल तर हा एक चांगला पर्याय होऊ शकतो.

# परतीच्या पावसाने काढणीस आलेल्या पिकांचे नुकसान

पुणे : राज्यात परतीचा पाऊस धुमाकुळ घालत असून त्यामुळे काढणीला आलेल्या पिकांचे नुकसान होत आहे. कांद्याचे आगार म्हणून ओळख असलेल्या नाशिक जिल्ह्यातील लासलगाव, निफाड, चांदवड, येवला तालुक्यामध्ये परतीच्या पावसामुळे कांदा पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतामध्ये पाणी साचल्यामुळे कांदा पीक पाण्याखाली गेले आहे. त्यामुळे उत्पादनात घट होणार आहे.

पावसामुळे झालेल्या नुकसानीमुळे शेतकऱ्यांचा कांदा पिकाचा उत्पादन खर्च सुध्दा निघणार नसल्याचे शेतकरी सांगत आहेत. दुसरीकडे अनेक



जिल्ह्यात परतीच्या पावसामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मका, कापूस, सोयाबीन, तूर या पिकांना फटका बसला आहे. अनेक शेतकऱ्यांनी शेतात सोयाबीन काढून गंजी केल्या होत्या मात्र वादळी वारा व पावसामुळे सोयाबीनच्या गंजीत पाणी शिरल्याने शेतमालाचे प्रचंड नुकसान झाले आहे. वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे घरावरील व जनावरांच्या गोठ्यावरील पत्रे उडून गेले आहेत. त्यामुळे दिवाळीआधी शेतकऱ्यांवर संकट कोसळले आहे. शासनाने नुकसानीचे पंचनामे करून मदत करावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत.

# जनावरांना गूळ खाऊ घालण्याचे फायदे आणि तोटे

बरेच पशुपालक आपल्या जनावरांना गुळ खाण्यासाठी देतात. गुळामध्ये कॅल्शियम जास्त असते असे, अनेक पशुपालकांना वाटते. परंतु गुळामध्ये कॅल्शियमचे प्रमाण किती असते व तो किती व कधी खायला द्यावा, याबाबत माहिती असणे आवश्यक आहे.

गुळामध्ये असणारे अन्नघटक : गुळामध्ये ८० टक्के सुक्रोज, १० टक्के ग्लुकोज व फ्रुक्टोज, ५ ते ७ टक्के पाणी आणि उरलेले ३ टक्के क्षार घटक असतात. १०० ग्रॅम गुळामध्ये ४० ते १०० मि.ग्रॅ. कॅल्शियम असते. म्हणजे १ किलो गुळ जनावरांना खाऊ घातल्यास फक्त १ ग्रॅम कॅल्शियम मिळते. त्याचबरोबर मॅग्नेशियम, फॉस्फरस, सोडियम यांचे देखील प्रमाण ३० ते १०० मि.ग्रॅ प्रति १०० ग्रॅम असते. लोह १०-१३ मि.ग्रॅ. प्रति १०० ग्रॅम असते. दुधाळ जनावरांना २० ते २५ मि.ग्रॅ. लोह आवश्यक असते. त्यामुळे गुळामधून जनावरांना लोह चांगल्या प्रमाणात मिळते. परंतु हा गुळ लोखंडाच्या कढईत पारंपरिक पद्धतीने बनवला असेल तरच त्या गुळामध्ये लोहाचे प्रमाण चांगले असते. गुळातील अन्नघटकाचा विचार केला तर गुळामधून जनावरांना कॅल्शियम नगण्य प्रमाणात



मिळते.जनावरांना गुळ खायला द्यावा की नाही? : गुळामध्ये शर्करेचे प्रमाण जास्त असल्याने जनावरांना थोड्या प्रमाणात गुळ खायला दिल्याने लगेच ऊर्जा मिळते. परंतु जनावरांना गरजेपेक्षा जास्त म्हणजे २०० ग्रॅम पेक्षा जास्त गुळ खायला दिला आणि त्याचबरोबर सकस हिरवा चारा दिला तर जनावरांच्या पोटामध्ये शर्करेचे प्रमाण वाढते. पोटातील जिवाणू लॅक्टीक असिड मोठ्या प्रमाणावर तयार करतील, त्यामुळे असिडोसिस होण्याची शक्यता असते. असिडोसिसमुळे जनावरांचे पचन बिघडते. त्यामुळे जनावरांना गरज असेल तरच व प्रमाणात गुळ देणे महत्त्वाचे आहे.

जनावरांना गुळ कधी खाऊ घालावा? : जनावरे विल्यानंतर जनावरांना मोठ्या प्रमाणात ऊर्जा मिळणे गरजेचे असते. कारण जनावर विण्याच्या अगोदर कमी प्रमाणात चारा खाते किंवा चारा खात नाही. वासराचे वजन जनावराच्या कोटीपोटावर पडल्यामुळे जनावराची चारा खाण्याची व रवंथ करण्याची क्षमता कमी झालेली असते. जनावर विल्यानंतर गर्भाशयातून रक्तस्राव होतो त्यामुळे जनावरे व्यायलानंतर जनावराला लवकर ऊर्जा मिळण्यासाठी गुळ खायला देणे फायदेशीर असते.

गुळ कसा खायला द्यावा : जनावर व्यायल्यानंतर कोमट पाण्यामध्ये २०० ग्रॅम गुळ विरघळवून जनावरांना द्यावा. त्याचबरोबर २०० ते २५० ग्रॅम तृणधान्याच्या लापशीमध्ये १०० ग्रॅम गुळ घालून व्यायलेल्या जनावराला द्यावा. जनावरांना बनवलेल्या लापशीमध्ये २०० ते २५० ग्रॅमपेक्षा जास्त तृणधान्याचे प्रमाण असू नये. गुळामध्ये कॅल्शियमचे प्रमाण हे फार कमी असते, त्यामुळे जनावरांमधील कॅल्शियमची कमतरता भरून काढण्यासाठी गुळाचा वापर करू नये.

## दिन विशेष

जागतिक दिवस:
आंतरराष्ट्रीय ओझोन दिन
मेक्सिकोचा स्वातंत्र्यदिन

### महत्वाच्या घटना

१६२० : 'मेफ्लॉवर' जहाजाने साउदॅम्पटन बंदरातुन उत्तर अमेरिकेकडे प्रयाण केले.
१८२१ : मैक्सिकोच्या स्वातंत्रतेला मान्यता देण्यात आली होती.
१८६१ : ब्रिटन देशांतील पोस्ट ऑफिस मध्ये बचत खाता उघडण्यास सुरुवात झाली.
१९०८ : 'जनरल मोटर्स कॉर्पोरेशन' या कंपनीची स्थापना झाली.
१९३५ : इंडियन कंपनीज ॲक्ट अन्वये 'बँक ऑफ महाराष्ट्र'ची नोंदणी करण्यात आली.
१९४५ : दुसरे महायुद्ध हाँगकाँगमधील जपानी सैन्याने रॉयल नेव्हीसमोर शरणागती पत्करली
१९६३ : झेरॉक्स ९१४ या प्रतिमुद्रक यंत्राचे पहिले प्रात्यक्षिक.
१९६७ : सोव्हियत संघाने पूर्व कजाख मध्ये आण्विक चाचणी केली.
१९७५ : पापुआ न्यू गिनी या देशाला (ऑस्ट्रेलियापासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९८७ : ओझोनच्या थराच्या कमीत कमी संरक्षण करण्यासाठी मॉन्ट्रियल प्रोटोकॉलवर स्वाक्षरी केली आहे.
१९९७ : आय. टी. सी. आंतरराष्ट्रीय मैदानी स्पर्धेत राजीव बालकृष्णन याने शंभर मीटर धावण्याच्या शर्यतीत १०.५० सेकंद वेळ नोंदवून राष्ट्रीय विक्रम केला.
१९९७ : संस्कृत भाषेसंदर्भात प्रशंसनीय कार्य केल्याबद्दल मुंबई येथील मराठा मंदिर संस्थेच्या वरळी हायस्कूलमधील संस्कृतचे निवृत्त शिक्षक पं. गुलाम दस्तगीर अब्बासअली बिराजदार यांना 'राष्ट्रीय संस्कृत पंडित' हा राष्ट्रपतींकडून दिला जाणारा पुरस्कार जाहीर
२००८ : भारतीय हेवी इलेक्ट्रिकल्स लिमिटेड (भेल) च्या कर्मचाऱ्यांना विश्वकर्मा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१३८० : चार्ल्स (सहावा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: २१ आक्टोबर १४२२)
१३८६ : हेन्री (पाचवा) इंग्लंडचा राजा (मृत्यू: ३१ ऑगस्ट १४२२)
१८५३ : नोबेल पारितोषिक विजेते जर्मन डॉक्टर आल्ब्रेख्त कॉसेल यांचा जन्म.
१८८८ : बेंटले मोटर्स लिमिटेड चे डब्ल्यू ओ. बेंटले यांचा जन्म. (मृत्यू: १३ ऑगस्ट १९७१)
१९०७ : वामनराव सडोलीकर भारतीय हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या जयपूर-अत्रोली घराण्यातील प्रसिद्ध शास्त्रीय गायक (मृत्यू: २५ मार्च १९९१)
१९१३ : कमलाबाई कृष्णाजी ओगले 'रुचिरा' या पाकशास्त्रावरील प्रचंड खपाच्या पुस्तकाच्या लेखिका (मृत्यू: २० एप्रिल १९९९)
१९१६ : एम. एस. सुब्बुलक्ष्मी भारतरत्न, पद्मभूषण, पद्म विभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय शास्त्रीय कर्नाटकी गायक (मृत्यू: ११ डिसेंबर २००४)
१९२३ : सिंगापूरचे पहिले पंतप्रधान ली कुआन यी यांचा जन्म. (मृत्यू: २३ मार्च २०१५)
१९२५ : आयर्लंडचे पंतप्रधान चार्ल्स हॉगे यांचा जन्म.
१९३१ : भारतीय क्रिकेट पंच आर. रामचंद्र राव यांचा जन्मदिन.
१९४२ : नामदेव धोंडो तथा 'ना. धों' महानोर निसर्ग कवी व प्रयोगशील शेतकरी, त्यांना 'पानझड' या कवितासंग्रहासाठी साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे. १९ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.
१९५४ : संजय बंदोपाध्याय भारतातील बंगाली हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील प्रख्यात सितार वादक
१९५६ : डेव्हिड कॉपरफिल्ड अमेरिकन जादूगार
१९७१ : भारतीय हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध गीतकार, पटकथा लेखक व कवी प्रसून जोशी यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६८१ : मुघल शासक दारा शिकोह आणि सम्राट औरंगजेब यांची मोठी बहीण जहाँनारा बेग़म यांचे निधन.
१७३६ : डॅनियल फॅरनहाइट जर्मन शास्त्रज्ञ (जन्म: २४ मे १६८६)
१८२४ : लुई (अठरावा) फ्रान्सचा राजा (जन्म: १७ नोव्हेंबर १७५५)
१९३२ : सर रोनाल्ड रॉस हिवतापाच्या जंतुंचा शोध लावल्याबद्दल नोबेल पारितोषिक मिळवणारे (१९०२) ब्रिटिश डॉक्टर (जन्म: १३ मे १८५७ आल्मोडा, उत्तराखंड)
१९४४ : भारतीय अभियंता व काशी हिंदू महाविद्यालयाचे माजी उप कुलगुरू ज्वालाप्रसाद यांचे निधन.
१९६५ : फ्रेड क्मिम्बी अमेरिकन ॲनिमेशनपट निर्माते (जन्म: ३१ जुलै १८८६)
१९६५ : परमवीर चक्र पुरस्कार विजेता भारतीय सैन्य अधिकारी लेफ्टनंट कर्नल ए.बी. तारापोर यांचे निधन.
१९७३ : पुण्यातील जुन्या पिढीतील सरदार, पर्वती संस्थानचे विश्वस्त, संगीतज्ञ, इतिहासाचे अभ्यासक गंगाधरराव नारायणराव तथा आबासाहेब मुजुमदार यांचे निधन. त्यांचे मूळ नाव श्रीधर पांडुरंग प्रभुणे होते. मुजुमदारांकडे ते दत्तक गेले. पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाचे ते चोवीस वर्षे चिटणीस होते.
१९७७ : केसरबाई केरकर साहित्य नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित जयपूर-अतरौली घराण्याच्या भारतीय शास्त्रीय गायिका (जन्म: १३ जुलै १८९२)
१९८४ : बिकीनि चे निर्माते लुई रायर्ड यांचे निधन. (जन्म: १६ सप्टेंबर १९८४)
१९९४ : जयवंत दळवी साहित्यिक, नाटककार व पत्रकार. कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, विनोदी लेख असे विविध प्रकार त्यांनी हाताळले. ते 'ठणठणपाळ' या टोपणनावाने विनोदी व मार्मिक लेखन करीत. (जन्म: १४ ऑगस्ट १९२५)
२००५ : लेसर चे शोधक गॉर्डन गूल्ड यांचे निधन. (जन्म: १७ जुलै १९२०)
२०१२ : आयमॅक्स चे सहसंस्थापक रोमन कोरियटर यांचे निधन. (जन्म: १२ डिसेंबर १९२६)
२०१७ : पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय वायुदलाचे वरिष्ठ अधिकारी मार्शल अर्जन सिंह यांचे निधन.

# ६० कोटींच्या कामात नरवडेंची कोणती व्यवस्था झाली?

## आ.प्रकाश सोंळकेंच्या लाडक्या जयदत्त नरवडेंची जिभ घसरली

## जनता सगळं जाणून आहे, टक्केवारीचे आरोप उगाच होत नाहीत आण्णा!

## जयदत्त नरवडे माध्यमांची मुंगी चावल्यास लुंगी फिटेल

माजलगांव । प्रतिनिधी

माजलगांव मतदार संघात सध्या विविध विकास कामांच्या उदघाटनाचा जणु धुराळाच उडाला आहे त्यात ज्या त्या परिसरातील आपले पिद्दु आमदार सोळंके यांच्याकडुन बोलविते केले जात आहेत.माळेवाडी सुलतानपुर या ठिकाणी हॅम अंतर्गत सादोळा ते राजेगांव या सुमारे ६० कोटींच्या कामाचे उदघाटन दि १३ ऑक्टोबर रविवारी आचार संहितेच्या भितीपोटी घाई गडबडीत उरकण्यात आले यावेळी पार पडलेल्या छोटेखाणी कार्यक्रमात आ. सोळंके यांचे गचपडीची गोळी खावुन विविध सत्तेच्या पदांचा मलिदा खाणा-या सभापती जयदत्त नरवडे यांनी अत्यंत मिश्किलपणे पत्रकारांची खोड काढतांना तुमची सगळीच सोय करण्यात आली आहे असे म्हणुन उपस्थित पत्रकारांना खिजविण्याचा प्रकार केला याला कांही पत्रकार बांधवांनी लगेचच विरोध केल्यावर माफीचे सोयिस्करही त्यांनी पार पाडले परंतु स्वतःच्या परिसरात होत असलेल्या कार्यक्रमात जयदत्त नरवडेंची देखील संबंधीत कंत्राटदार एजन्सीने चांगलीच व्यवस्था केलेली



दिसते त्यामुळेच नरवडे यांना आपली जीभ कुठे घसरतेय हे कळले नसावे ? असे आता बोलल्या जात आहे.

माजलगांव आणि गेवराई विधानसभेच्या बांधावर असलेल्या सादोळा ते राजेगांव या परिसराचा विकास तसा खुपच आडगळीला राहिलेला आहे. परंतु मागील काळात होत असलेला जनरेटा पाहुन हॅम अंतर्गत १३ किलोमिटरच्या कामासाठी तब्बल ६० कोटी रुपयांचा निधी शासनाने दिला. आगामी दोन चार दिवसांत आचार संहिता लागण्याचे संकेत आहेत त्यामुळेच तडकाफडकी कामांची उदघाटने उरकण्याचा घाट घातला जात आहे. असेच एक उदघाटन माळेवाडी या ठिकाणी पार पडले.एरव्ही प्रत्येकवेळी पत्रकारांची ऍलर्जी असलेल्या बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडेंच्या भागात हे काम होत असल्यामुळे अगदी लगबगीने फोन लावुन पत्रकारांनाही या कार्यक्रमासाठी निमंत्रीत करण्यात आले.मात्र जयदत्त नरवडेंना या उदघाटनाच्या कार्यक्रमात कुठला उत्साह होता हे कळुन आले नाही कारण नरवडे हे त्यांच्या प्रास्ताविकात चक्क पत्रकारांवरच घसरले आणि पत्रकारांकडे बघुन त्यांनी अत्यंत मिश्कीलपणे तुमची तर सगळीच व्यवस्था केली आहे असे म्हणुन पत्रकारांना खिजविण्याचा प्रकार केला.त्यावर कांही पत्रकार बांधवांनी लगेचच आक्षेप घेतला असता आपल्याकडुन चुक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले व त्यांनी जाहिररित्या माफी देखील मागीतली.मात्र कार्यक्रमाला बोलावुन वरुन अशा पध्दतीने वागणुक दिल्याने पत्रकारांकडुन या बाबीचा जाहिर निषेध नोंदवला जात आहे. तर आ. सोळंकेंनी अशा बाडंगुळ पिददुंना आवरावे अशी मागणी देखील पत्रकारांकडुन केल्या जात आहे.दरम्यान मांडीआड करुन तंगडी खाणा-या जयदत्त नरवडे यांना कायम पत्रकारांची ऍलर्जी राहिलेली आहे मात्र नक्कीच ६० कोटींच्या कामात चांगलाच मलिदा मिळणार असल्याने एव्हाणा मिळालेला असल्याने नरवडे कदाचित भारावले असावेत आणि त्यातुनच त्यांनी अशा प्रकारे पत्रकारांना खिजविण्याचा प्रकार केला असावा असे आता बोलल्या जात आहे.

### बाजार समितीत नरवडेंनी काय काय दिवे लावलेत सर्वांना माहिती आहेत

जयदत्त नरवडे हे मागील अनेक वर्षांपासुन बाजार समितीत उपसभापती व त्यानंतर आता सभापती म्हणुन मांडी आड करुन आंडी खात आहेत पण त्यांची गत डोळे बंद करुन दुध पिणा-या मांजरागत आहे.त्या मांजराला वाटतं डोळे बंद केल्याने आपल्याकडे कुणी पाहात नाही.परंतु असे नसुन बाजार समितीत नरवडेंनी काय काय दिवे लावलेत आणि त्या दिव्यात तेल कुठुन कुठुन आलं हे सर्व माध्यमांना तर सोडाच सर्वसामान्यांनाही माहित आहे त्यामुळे असेच घसरत राहिलात तर माध्यमांची मुंगी तुमच्या कुठल्या भागाला चावेल आणि विविध ठिकाणच्या आपल्या कारभाराची लुंगी कशी फिटेल याची कल्पना सुध्दा तुम्हाला लागणार नाही.अशा प्रतिक्रिया बाजार समितीविषयीच्या जाणकारांमधुन येत आहेत.

## थोडक्यात




### कॉ.नागरगोजे यांचे पंचायत समिती समोर धरणे आंदोलन

पाटोदा। प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील चुंबळी गावात पिण्याच्या पाण्याच्या विविध योजना राबविण्यात आल्या मात्र अगापही गावात १५ ते २० वर्षापासुन गावातील जनतेला पाण्यापासुन वंचीत ठेवणाऱ्या अधिकारी व पदाधिकारी यांच्यावर कठोरात कठोर कार्यवाही करुन, पाण्याची व्यवस्था करावी.या मागण्यांसाठी भारतीय किसान सभा यांच्या वतीने दि.१४/०४/२०२१ रोजी पंचायत समिती समोर धरणे आंदोलन खालील मागण्यासाठी आंदोलन करण्यात आले पाच दिवसाच्या आत पाणी देवुन,रस्ता दुरुस्त करुन देवु असे लेखी देवुनही काहीच केले नाही.त्या संबंधितावर कडक कार्यवाही करावी. १४ व १५ वी वित्त आयोग २०१७,२०१८ ते आजपर्यंत ची चौकशी करुन, संबंधितावर कार्यवाही करावी या मागणीसाठी भारतीय किसान सभेचे जेष्ठनेते कॉ.महादेव नागरगोजे, वंचित बहुजन आघाडीचे गोरख झेंड,सचिन मेगडबर यांच्या सह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

### श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात मतदार जनजागृती

माजलगाव । प्रतिनिधी

येथील श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात 'चुनाव की पाठशाला 'या शासनाच्या अभियानानुसार मतदार जनजागृती प्रतिज्ञा विद्यार्थ्यांनी घेतली. १८ वर्षे वय पूर्ण केलेले



महाविद्यालयातील विद्यार्थी यांनी नव मतदार म्हणून यावर्षी नोंद केलेली आहे.यानुसार नूतन मतदार आणि नागरिकांमधील मतदानाविषयी उदासीनता दूर व्हावी आणि सुजाण नागरिक म्हणून मतदान करण्यास तरुण तसेच सर्व वर्ग प्रवृत्त व्हावा ही प्रतिज्ञा घेण्यात आली.या प्रतिज्ञेतून सर्व मतदारांनी कोणत्याही आमिषाला बळी न पडता तसेच धर्म, पंथ व इतर बाबीचा विचार न करता मतदान करून कर्तव्याचे पालन करावे असे आवाहन करण्यात आले.विद्यार्थ्यांना मतदान जनजागृती शपथ कार्यक्रम उपप्राचार्य प्रा. अंकुश साबळे, पर्यवेक्षक प्रा. परमेश्वर खेत्री यांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाला या वेळी महाविद्यालयाचे बहुसंख्य विद्यार्थी, कर्मचारी उपस्थित होते.

### रविकांत राठोड यांची निवड

माजलगाव । प्रतिनिधी



ग्राम विकास विभागाच्या अंतर्गत शासनाच्या अशासकीय समितींच्या तीन वर्षांसाठी निवडी करण्यात आल्या आहेत. यामध्ये संत सेवालाल महाराज बंजारा/लमाण तांडा समृद्धी योजनेतर्गत असलेल्या राज्यस्तरिय समितीच्या सदस्यपदी बंजारा समाजाचे तरूण तडफदार नेतृत्व रविकांत राठोड यांनी सदस्यपदी निवड करण्यात आली आहे. गेल्या अनेक वर्षापासून समाजाच्या हितासाठी कायम तत्पर राहून समाजहित जपणारे युवा नेतृत्व म्हणून रविकांत राठोड सिद्ध झालेले आहेत. संत सेवालाल महाराज बंजारा/लमाण तांडा समृद्धी योजनेतर्गत अप्पर मुख्य सविव/प्रधान सचिव/ सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये निवड करण्यात आली आहे. तांड्यासाठी स्वतंत्र्य ग्रामपंचायत स्थापन करणे, तांड्याला महसूली गाव घोषीत करणे व इतर अनुषंगिक कामे करणे यासाठी समाजातील नेतृत्व करणार्यांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये रविकांत राठोड यांचीही निवड करण्यात आल्याने सर्वस्तरातून त्यांचे कौतुक केले जात असून पुढील कार्यासह शुभेच्छा दिल्या जात आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेतून लाभार्थ्यांना वगळले

## मयुरी खेडकर-मस्के यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार, आंदोलनाचा दिला इशारा

गेवराई। प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना तसेच इतर गोरगरीबांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनेतून गेवराई तालुक्यातील अनेक गावे तसेच शेकडो लाभार्थ्यांना वगळण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी गेवराई विधानसभा मतदार संघाच्या नेत्या मयुरी खेडकर-मस्के यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली असून लाभार्थ्यांचा यादीत समावेश करण्याची मागणी केली आहे. दरम्यान घरकुलची मागणी केलेल्या लाभार्थ्यांचा सदरील घरकुल यादीत समावेश न केल्यास तिव्र आंदोलन छेडण्याचा इशारा या निवेदनाद्वारे मयुरी खेडकर-मस्के यांनी दिला आहे.



राज्यात इतर मागास समाजातील नागरिकांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल राबविण्यात येत आहे. याचबरोबर पंतप्रधान आवास योजना, यशवंतराव चव्हाण घरकुल योजना बंजारा, वंजारी, वडार समाज तसेच रमाई घरकुल योजना, शबरी घरकुल योजना या सुद्धा योजनेतून गोरगरीबांना घरकुल देऊन हक्काचा निवारा शासनाकडून दिला जातो. दरम्यान गेवराई तालुक्यातील गावागावातून या योजनेत गोरगरीबांनी अर्ज दाखल करुन घरकुलची मागणी केली होती. मात्र या घरकुल यादीतून गेवराई तालुक्यातील अनेक गावे तसेच मागणी केलेल्या शेकडो लोकांची नावे वगळण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मंजूर घरकुल योजनेमुळे इतर मागास समाजातील कुटुंबांना हक्काचे घर मिळणार होते. मात्र मागणी केलेल्या गोरगरीबांची नावे यादीत आलीच नाहीत. त्यामुळे गरजू लाभार्थ्यांचा घरकुल यादीत समावेश का करण्यात आला नाही? असा प्रश्न गेवराई विधानसभा मतदार संघाच्या नेत्या मयुरी खेडकर-मस्के यांनी उपस्थित केला आहे. तसेच ज्या लोकांनी घरकुल मिळावे यासाठी अर्ज दाखल केले, त्यांच्यावर अन्याय न करता मागणी केलेल्या प्रत्येकाला घरकुल देण्यात यावे. त्याचबरोबर वगळण्यात आलेल्या गावांना सुद्धा यादीमध्ये समाविष्ट करावे, यादीमध्ये कुठल्याही प्रकारच्या व्यक्तींवर अन्याय होता कामा नये, याप्रकरणी बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्याकडे तक्रार देखील दाखल केली आहे. यामध्ये घरकुल योजनेतून वगळण्यात आलेल्या लाभार्थ्यांची नावे समावेश करण्याची मागणी करण्यात आली असून हि मागणी केलेल्या लाभार्थ्यांची नावे यादीत समावेश न केल्यास तिव्र आंदोलन छेडण्याचा इशारा मयुरी खेडकर-मस्के यांनी दिला आहे.

# शेतीसाठी शेकापचा खटारा निवडून द्या-भाई ॲड. नारायण गोले

माजलगाव। प्रतिनिधी

निवडणूक जाती धर्मासाठी नाही तर शेतीसाठी झाली पाहिजे, शेतकऱ्याच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी झाली पाहिजे पण दुर्दैवाने तसे होताना दिसत नाही अलीकडे जातीला, धर्माला भांडवलदारी पक्ष, विकृत मनोवृत्तीचे भ्रष्टाचारी पुढारी महत्त्व देत असून शेतकऱ्याचे, कामगारांचे, कष्टकऱ्यांचे प्रश्न प्रलंबित असताना त्यावर कोणीही बोलायला तयार नाही उलट गेल्या दहा वर्षात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा आकडा हजारोच्या संख्येने वाढत असताना प्रस्थापित पुढारी केवळ घराणेशाही जोपासण्यात आणि भ्रष्टाचारातून माया जमवण्यात व्यस्त असताना कष्टकऱ्यांनी भ्रष्टाचारी आणि भांडवलदारी पुढार्याकडून आणि भांडवलदारी पक्षाकडून आपल्या हिताची जोपासना होईल अशी अपेक्षा ठेवणे चुकीचे असून शेतकऱ्यांच्या हितासाठी आणि प्रश्नासाठी रस्त्यावर उतरून



हमीभावासह शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नावर आंदोलने, मोर्चे करून प्रशासनाला आणि शासनाला धारेवर धरणारा शेतकऱ्याच्या कुटुंबातील उमेदवार विधानसभेत गेला पाहिजे, बीड जिल्ह्याला क्रांतिसिंह नाना पाटील, गंगाधर आप्पा बुरांडे यांच्यासह आदि लाल बावट्यांच्या नेत्यांच्या विचाराने कष्टकऱ्यांच्या, शेतकऱ्याच्या आणि कामगारांच्या जीवनामध्ये क्रांती करण्यासाठी माजलगाव विधानसभेवर शेतकरी कामगार पक्षाचे भाई ॲड नारायण गोले पाटील यांच्या खटारा चिन्ह समोरील बटन दाबून जातीसाठी नाही तर मातीसाठी आणि शेतीसाठी शेतकरी कामगार पक्षाचा खटारा विधानसभेत पाठवा असे अवाहन सिमरी पारगाव येथे दि.१४ ऑक्टोबर रोजी नागरिकांशी संवाद साधताना भाई ॲड. नारायण गोले पाटील यांनी केले. यावेळी शेकडो गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# शिवसेनेत २६०० हून अधिक महिलांचा प्रवेश

## लाडकी बहीण योजनेने दिला आधार

मुंबई। प्रतिनिधी

शिवसेना पक्षात महिलांचे प्रतिनिधित्व दिवसेंदिवस वाढत असून, नुकताच २६०० हून अधिक महिलांनी पक्षात प्रवेश केला आहे. हे सर्व महिलांचे सशक्तीकरण व कल्याण करण्याच्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या लाडकी बहीण योजनेच्या दृष्टीकोनाने प्रेरित होऊन झाल्याचे दिसून येत आहे.

लाडकी बहीण योजना ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुरू केलेली एक महत्वाकांक्षी योजना आहे, जी महाराष्ट्रातील माता आणि बहिणींच्या सक्षमीकरणावर केंद्रित आहे. या योजनेच्या माध्यमातून महिलांना आर्थिक मदत, सामाजिक सुरक्षेचे लाभ, तसेच विविध विकासात्मक कार्यक्रमांचे लाभ मिळण्यास प्रोत्साहन दिले जाते.

शिवसेना पक्षाच्या नेतृत्वाने महिलांना सशक्त करण्याचे काम सातत्याने केले आहे. लाडकी बहीण योजनेच्या यशामुळे महिलांचे मोठ्या प्रमाणावर पक्षाकडे आकर्षण वाढले आहे.

या योजनेतून महाराष्ट्रातील महिलांना भविष्याची नवी दिशा मिळत असून, पक्षाचा महिला वर्गातील आधार मजबूत होत आहे. म्हणूनच महाराष्ट्रातील विविध भागातील महिलांनी शिवसेनेमध्ये प्रवेश केला. ठाणे,पालघर , उत्तर महाराष्ट्र आणि मुंबई या विभागात शिवसेनेत प्रवेश करणाऱ्या महिलांची संख्या लक्षणीय होती.



# मुक्ताराम सोनवणे यांचा कडा बाजर समितीकडून सत्कार

कडा । प्रतिनिधी

कृषी उत्पन्न बाजार समिती,कडा ता.आष्टी जि.बीड च्या वतीने मुक्ताराम शिवाजी सोनवणे राहणार गाडे पिंपळगाव यांचा सत्कार करण्यात आला. कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल महाराष्ट्र शासनाकडून बीड जिल्ह्यातील पुरस्कार प्राप्त शेतकरी बांधवांचा सत्कार व शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष आ.सुरेश धस माजी मंत्री तथा विधान परिषद सदस्य तशेच कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून पंजाबराव डक हवामान तज्ञ, साहेबराव मस्के तालुकाध्यक्ष हे होते.कार्यक्रमाचे आयोजन रमजान तांबोळी सभापती कृषी बाजार समिती,कडा व नामदेव धोडे उपसभापती कृषी बाजार समिती,कडा, सर्व



संचालक मंडळ,सचिव व कर्मचारी कृषी उत्पन्न बाजार समिती,कडा च्या वतीने करण्यात आले होते.नुकताच कृषी क्षेत्रात उलेखनीय कार्य केल्या बद्दल सोनवणे यांचा महाराष्ट्र शासनाच्या वतीने मा.राज्यपालांच्या उपस्थितीत शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्काराने गौरव करण्यात आला.याच पार्श्वभूमीवर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने जिल्ह्यातील पुरस्कार प्राप्त शेतकरी बांधवांचा सत्कार कार्यक्रम कृषी उत्पन्न बाजार समिती,कडा ता.आष्टी जि.बीड येथे आयोजित करण्यात आला. यामध्ये मुक्ताराम सोनवणे यांचा हि सन्मान सत्कार करण्यात आला.

# मुख्यमंत्री साहेब भाजप संपवायचंय का?

जालना । प्रतिनिधी

भाजपचे नेते पाच ते दहा वर्षापासून पक्षाचं काम करतात अशा नेत्यांना सर्वांचा पाठिंबा असतो विकासाची गंगा घनसावंगी तालुक्यात भाजपचे नेते सतीश घाटगे हे पाच वर्षापासून जनतेच्या दारात जाऊन समस्या जाणून घेऊन मार्ग लावीत आहे तसेच विकासाची काम मोठ्या प्रमाणात श्री घाटगे यांनी केले आहे हे कोणाला सांगण्याची गरज नाही तसेच लग्न कार्यामध्ये गरिबांना मदत करण्याचं काम त्यांनी केलं. उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे कट्टर समर्थक हिकमती उढाण हे आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटामध्ये उमेदवारी मिळण्यासाठी प्रवेश करीत आहे परंतु असा प्रवेश केल्याने जनतेचा विश्वास राहत नाही हे मुख्यमंत्री साहेबांनी लक्षात घेतलं पाहिजे म्हणून घनसावंगी विधानसभेत भाजप पक्ष वाढला असून आता या प्रवेश सोहळा या मुळे भाजप पक्ष कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही यामुळे भाजप व शिंदे गटामुळे मतदारांमध्ये नाराजी पसरली आहे याचा फायदा शरद पवार राष्ट्रवादी गटाला होणार आहे. यामुळे भाजप व शिंदे या गटावर मतदारांचा विश्वास उडाला असे बोलल्या जात आहे.

घनसावंगी भाजपा नेते माजी नगराध्यक्ष सुनील आर्दड यांनी घनसावंगी मतदारसंघांमध्ये प्रत्येक बुध वर भारतीय जनता पार्टीचे मजबूत संघटन असून भारतीय जनता पार्टीच्या ज्येष्ठ मंडळींनी तसेच आपण स्वतः पक्ष विस्तारासाठी गेल्या १७ /१८ वर्षापासून घनसावंगीत काम केले आहे त्यामुळे घनसावंगी मतदारसंघावर महायुतीमध्ये भारतीय जनता पार्टीचा प्रबळ दावा आहे व पक्षश्रेष्ठींकडे मतदारसंघ भाजपला सोडून घेण्यासाठी आपण शिष्टमंडळासह भेट घेऊन मागणी करणार आहोत असे त्यांनी सांगितले. मतदारसंघांमध्ये २५० शाखांची उभारणी आपण केलेली आहे .तसेच भारतीय जनता पार्टीने त्यामुळे भारतीय जनता पार्टी कडून आपल्याला उमेदवारी मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी कार्यकर्त्यांनी भावना व्यक्त केल्या व भारतीय जनता पार्टीला ही जागा सोडून घेऊन स्थानिक उमेदवार सुनील आर्दड यांनाच उमेदवारी द्यावी असा आग्रह पक्षश्रेष्ठींकडे करणार असल्याचे सर्वांनी सांगितले. मुख्यमंत्री शिंदे गटाचा उमेदवार व जिल्ह्याबाहेरील व्यक्तीला उमेदवारीसाठी कडाडून विरोध आहे असे बोलल्या जात आहे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दर्शविला.

cmyk

राज्य
लोकतंत्र

मंगळवार, दि.१५ ऑक्टोबर २०२४


# आमदार लक्ष्मण आण्णांनी आणलेले प्रत्येक काम दर्जेदारच होईल यांची काळजी घेतली -शिवराज पवार

## शासकीय विश्रामगृहाच्या नविन बांधकाम इमारतीचे शिवराज पवारांच्या हस्ते उद्घाटन संपन्न

गेवराई । प्रतिनिधी

मतदारसंघातील जनतेने आ.लक्ष्मण आण्णा पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला तेव्हा पासून आ.आण्णांनी मतदार संघाची प्रमाणीक पणे सेवा करत मतदारसंघातील प्रत्येक काम पारदर्शकणे केले आहे त्यासाठी आण्णांनी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून आणला आज मतदारसंघात मोठ्या प्रमाणात कामे सुरू असून गेवराई विधानसभा मतदारसंघाचे महाराष्ट्रात नाव मोठे व्हावे हेच आमच्या पवार कुटुंबाचे ध्येय आसल्याचे शिवराज पवार यानी उद्घाटन प्रसंगी बोलतांना सागितले

मतदारसंघाचेआ. लक्ष्मण आण्णापवार यांच्या विशेष प्रयत्नातून आज दि.१३ रोजी शिवराज पवार यांच्या शुभहस्ते गेवराई येथील नवीन शासकीय विश्रामगृह इमारतीचा भूमिपूजन



सोहळा पार पडला.

यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश सुरवसे,शिवसेनेचे तालुकाध्यक्ष शिनुभाऊ बेदरे, सुशील जवंजाळ, मधुकर तौर, अय्युब बागवान राजेंद्र राक्षसभुवनकर, भगवान घुंबार्डे, राहुल खंडागळे,दादासाहेब गिरी, जान मोहम्मंद बागवान,नगरसेवक कृष्णा काकडे, राजाभाऊ आर्दड, भरत गायकवाड, आप्पासाहेब कानगुडे, संजय इंगळे,न किशोरजी धोंडलकर, फिरोज शेठ, मुन्ना शेठ, राम पवार, मा.उपनगराध्यक्ष मधुकर आप्पा वादे, सतीश दाभाडे सरपंच नंदू गरड,शिराळाचे सरपंच माऊली जाधव, ज्ञानेश्वरजी पवार,बंजारा क्रांती दलाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण चव्हाण,विष्णुपंत आतकरे,राजेभाऊ मातकर, शरद मोटे,गणेश मोटे,विठ्ठल मोटे, समाधान मस्के,कदीरभाई बागवान, बेदरे,करण जाधव, अमोल मस्के,माजेद भाई,गोरख मोटे,मुन्ना मोटे, रंजीत डरपे,ऋषिकेश मोटे,मुस्ताक भाई कुरेशी, मोंटी माटे,अरुण पवार, गणेश पवार,संतोष राठोड,आसेफ काजी,शेख उस्मान,फाहत भाई चाऊस,शोएब भाई,कृष्णकांत पाटील, रोहितजी राठोड,विष्णुपंत शेलार,मुरली अण्णा सुतार, दिपक शेलार,इमरान भैया पठाण,बळीभाऊ करे,विलास शिंदे,रविराज आहेर,विक्रम भोसले,योगेश मोटे,रमेश राठोड,सुंदर धस,योगेश मोटे,बाबभाई फिटर,जफर टेलर,सादेक चाचू,शेख नईम,प्रल्हादजी येळापुरे,संजय आंधळे कृष्णा पाटोळे व इतर कार्यकर्ते आणि पदाधिकारी तसेच समस्त गेवराई कर उपस्थित होते.

**मंगळवारी मतदारसंघातील ६५ कोटीच्या सिमेंट रस्ता कामांचे आज होणार उद्घाटन**


**तलवडारोड ते रेवकी देवकी गोदी रस्ता,रामपुरी ते ढालेगाव रस्ता,सुर्डी फाटा ते सेलु रस्ता, लोणाळा ते सिदफणा चिंचोली रस्ता,**

**जातेगाव रोड ते मुदापुरी रस्ता,सावरगाव ते चिखली रस्ता,चंकलंबा रोड ते ब्रम्हगाव रस्ता वरील सर्व गावातील रस्ते मिळुन ४० कि.मी. रस्त्यासाठी आ.लक्ष्मण पवार यांच्या प्रयत्नातून मंजुरी मिळाली आहे त्या सिमेंट रस्ता कामांचा आ.लक्ष्मण पवार, व शिवराज पवार, यांच्या हास्ते आज मंगळवारी उद्धाटन होणार आहे**

# लोणी येथील युवक कार्यकर्त्यांचा राजेभाऊ फड यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश

परळी । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील लोणी येथील शेकडो असंख्य युवक कार्यकर्त्यांचा युवक नेते राजेभाऊ फड यांच्या उपस्थितीत जाहिर प्रवेश करण्यात आला. राजेभाऊ फड यांनी प्रवेश केलेल्या सर्वांच्या गळ्यात पक्षाचा रुमाल टाकून सर्वांचे स्वागत करून आगामी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. राष्ट्रवादी काँग्रेस भटक्या विमुक्त सेलचे अध्यक्ष गणेश देवकते यांच्या नेतृत्वात कार्यकर्त्यांनी प्रवेश केला. लोणी येथील युवा कार्यकर्ते भागवत काचगुंडे यांची राष्ट्रवादी काँग्रेस भटक्या विमुक्त सेल परळी वैजनाथ तालुका सचिवपदी राजेभाऊ फड यांच्या हस्ते दिले नियुक्तीपत्र देऊन निवड करण्यात आली.



परळी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते राजेभाऊ फड यांच्या विधानसभा संपर्क कार्यालयात परळी तालुक्यातील लोणी येथील असंख्य युवक कार्यकर्ते यांनी युवा नेते राजेभाऊ फड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट पार्टीत जाहीर प्रवेश केला. युवा नेते राजेभाऊ फड यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये प्रभाकर काचगुंडे, रघुनाथ काचगुंडे, धम्म केदारे, प्रल्हाद सोनवणे, बंटी सोनवणे, कृष्ण देवकते, अमोल देवकते, तुकाराम काचगुंडे, गणेशराव देवकते, भागवत काचगुंडे, भगवान मंजुळ, सुदाम केदारे, पिकलं देवकते, संदिपान देवकते, अभिजित काचगुंडे, दत्ता काचगुंडे, अरुण काचगुंडे, अंगद सातपुते यांच्यासह असंख्य युवकांचा प्रवेश राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश झाला. आदरणीय खा.शरदचंद्रजी पवार साहेब उत्तुंग व्यक्तिमत्व आहेत.त्यांच्या विचारांनी व कार्याने प्रभावित होऊन अनेक युवक पक्षामध्ये प्रवेश करीत आहेत.

त्या सर्वांचे मनःपूर्वक स्वागत करतो. अनेक पदाधिकारी व तरुण सहकाऱ्यांच्या पक्ष प्रवेशाने परळी विधानसभा मतदारसंघात पक्ष संघटना नक्कीच बळकट होईल व राष्ट्रवादीची ताकद देखील वाढणार आहे. त्यादृष्टीने सर्वांनीच पक्षाची ध्येय धोरणे तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे काम एकजूटीने करावयाचे आहे,असे आवाहन युवा नेते राजेभाऊ फड यांनी केले. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश अध्यक्ष आ.जयंत पाटील, जिल्हाध्यक्ष आ. संदिप क्षीरसागर यांच्या सूचनेनुसार परळी वैजनाथ राष्ट्रवादी काँग्रेस भटक्या विमुक्त सेलच्या परळी वैजनाथ तालुका सचिवपदी लोणी येथील युवा नेतृत्व भागवत कचगुंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राजेभाऊ फड यांच्या हस्ते दिले नियुक्तीपत्र देण्यात आले आहे. आदरणीय खा.शरदचंद्रजी पवार यांच्या विचारानुसार पुढील काळात पक्षाच्या

पान ३ वर

# राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे खोलेश्वर महाविद्यालयात आयोजन



अंबाजोगाई । प्रतिनिधी

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या खोलेश्वर महाविद्यालयामध्ये स्व.नाना पालकर स्मृती राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन बुधवार, दिनांक १६ ऑक्टोबर २०२४ रोजी करण्यात आले आहे. भक्ती आणि शक्तीचा संगम तरूणांच्या जीवनात घडावा त्याचबरोबर विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान वृद्धिंगत व्हावे हा या स्पर्धेचा हेतू आहे. या दृष्टिकोनातूनच वक्तृत्व स्पर्धेच्या विषयांची निवड केली आहे. राष्ट्र, समाज आणि शिक्षण या त्रिसूत्रीला अनुसरून ही वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली आहे.

खोलेश्वर महाविद्यालय हे मागील ५३ वर्षांपासून शैक्षणिक क्षेत्रात विविध सामाजिक, शैक्षणिक गुणवत्तेच्या वाढीसाठी सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रयत्नशील आहे. चालू शैक्षणिक वर्ष हे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीचे त्रिशताब्दी वर्ष म्हणून सर्वत्र साजरे होत आहे. या निमित्ताने

पान ३ वर

# भारतीय जनता पार्टीकडून चंदनझिरा येथील घटनेचा निषेध



जालना । प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी च्या वतीने जालना येथील चंदनझिरा येथे एका नऊ वर्षाच्या चिमुरडीवर घटनेच्या निषेदार्थ संबंधित आरोपीवर तात्काळ कारवाही करण्यासाठी भाजप जालनाकडून पोलीस अधीक्षक, जालना यांना निवेदन देऊन तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.

जालना जिल्ह्यातील चंदनझिरा भागात काल रात्री काही नराधमांनी एका नऊ वर्षाच्या चिमुरडीवर अत्याचार करून मारहाण केल्याची घटना मनाला वेदना देणारी आहे. चंदनझिरा प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करून कठोर शिक्षा देण्यात यावी असे निवेदनात म्हटले आहे.

यावेळी भाजपा जालना विधानसभा प्रमुख भास्कर आबा दानवे, जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, महानगराध्यक्ष अशोक पांगारकर, प्रदेश निमंत्रित सदस्य राजेश राऊत, विमल ताई आगलावे, जिल्हा सरचिटणीस सिद्धिविनायक मुळे, सतीश जाधव, संध्याताई देठे, शिवराज जाधव, शुभांगीताई देशपांडे, अरुणाताई जाधव, शांतीलाल राऊत, आदींची उपस्थिती होती.



**म्हसोबावाडी : पावसाचा अचूक अंदाज देणारे हवामान तज्ञ पंजाबराव डक यांचा कडा येथील शेतकरी मेळाव्याच्या कार्यक्रमप्रसंगी आले असता त्यांचा सत्कार आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने करतांना अध्यक्ष अविनाश कदम, उपाध्यक्ष जावेद पठाण, पत्रकार अक्षय विधाते, संतोष नागरगोजे, समीर शेख आदी दिसत आहेत.**

# पोलिस कर्मचाऱ्यांना आवश्यक सुविधांसह दर्जेदार निवासस्थानासाठी प्रयत्न करणार

जालना । प्रतिनिधी

जनतेच्या रक्षणासाठी सदैव तत्पर असणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या सुविधांसह दर्जेदार निवासस्थान उपलब्ध करून देण्याबरोबरच शहरातील सदर बाजार आणि चंदनझिरा या दोन पोलिस ठाण्यांना नवीन इमारत बांधकामासाठी राज्य शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल अशी ग्वाही आ. कैलास गोरंटयाल यांनी पोलिस मित्र युवा महासंघाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. नितीन जैस्वाल आणि शिष्टमंडळाला दिली. जालना शहरातील रामनगर परिसरात



## आ. कैलास गोरंट्याल यांची शिष्टमंडळाला ग्वाही

असलेल्या पोलिसांच्या शासकीय निवास्थानांची झालेली दुरावस्था तसेच शहरातील सदर बाजार पोलीस ठाणे आणि चंदनझिरा पोलीस ठाण्यासाठी नवीन जागेसह नूतन इमारत उपलब्ध करून देण्याची मागणी पोलिस मित्र युवा महासंघाच्या शिष्टमंडळाने आ. कैलास गोरंटयाल यांच्याकडे आज सोमवारी केल्यानंतर त्यांनी उपरोक्त ग्वाही दिली. यावेळी युवा नेते अक्षय गोरंटयाल यांचीही उपस्थिती होती. जालना शहरतील रामनगर परिसरामध्ये पोलिस कर्मचाऱ्यांसाठी शासकीय पोलीस वसाहत असून तेथे जवळपास ३०० निवासस्थाने ही सुमारे ६४ वर्षांपूर्वी बांधण्यात आली आहेत. याशिवाय चार इमारतीमध्ये ९६ निवासस्थान असून सदरील निवस्थानांची

पान ३ वर

# माधव निर्मळ यांच्या गाव भेटीच्या धडाक्याने विरोधकांचे धाबे दणाणले





## धारूर तालुक्यातील देवदहिफळ, चाटगाव येथे साधला ग्रामस्थांशी संवाद

बीड । प्रतिनिधी

माजलगाव विधानसभा मतदारसंघांमध्ये जोरदार तयारी करत असलेले ओबीसी नेते माधव निर्मळ यांच्या गाव भेटीच्या धुमधडाक्याने विरोधकांचे धाबे दणाणले आहे. सोमवारी धारूर तालुक्यातील देवदहीफळ आणि चाटगाव या दोन गावाला त्यांनी भेट देऊन ग्रामस्थांशी संवाद साधला. विधानसभा निवडणुकीत आशीर्वाद देण्याचे आवाहन यावेळी त्यांनी केले.

माजलगाव विधानसभा मतदारसंघांमध्ये माधव निर्मळ यांनी निवडणूक लढवण्यासाठी सहा महिन्यापासून जोरदार तयारी केली आहे. पूर्ण मतदार संघ त्यांनी अक्षरशः पिंजून काढला असून गावागावात

पान ३ वर

# श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे नवरात्र उत्सवनिमित्ताने दांडिया कार्यक्रम

बीड । प्रतिनिधी

दि.११ ऑक्टोबर २०२४ रोजी श्री श्री रविशंकर विद्यामंदिर पिंपरगव्हाण रोड, श्री श्री रविशंकर बाल मंदिर आदर्श नगर बीड येथे शारदीय नवरात्र उत्सव निमित्ताने गरबा नृत्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी श्री श्री रविशंकर विद्या मंदिर संस्थेचे सदस्य श्री जैन सर, संस्थेचे सचिव श्री पारगावकर सर, शाळेचे मुख्याध्यापक श्री हंसे सर, शाळेच्या उपमुख्याध्यापिका अनिता सूर्यवंशी मॅडम यांची उपस्थिती होती. कार्यक्रमात सर्वप्रथम गौरी पूजन ,सरस्वती पूजन व श्री श्री रविशंकर गुरुजी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात



आले तसेच प्रमुख पाहुणे म्हणून शाळेतील पालक वर्ग उपस्थित होते त्यांच्या हस्ते देवीची आरती करण्यात आली.

यावेळी इयत्ता सातवीतील विद्यार्थ्यांनी नवरात्र उत्सवाबद्दल माहिती सादर केली. रावण दहन म्हणजेच आपल्यातील वाईट शक्तींचा नाश व उत्तम गुणांचा विकास करणे असे ते म्हणाले. कार्यक्रमात यानंतर इयत्ता सातवी, नववी व दहावीतील विद्यार्थिनींनी देवींच्या नऊ रूपांचा अविष्कार घडविणार्या अशा गीतावर सुंदर असे नृत्य सादर केले. प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहात गरबा नृत्य सादर केले. त्यानंतर शाळेतील विद्यार्थिनींचे कुमारीका पूजन करण्यात आले सर्व

पान ३ वर

# आज होणाऱ्या नऊगण यात्रेस उपस्थित रहावे -श्री गुरु मानूरकर महाराज

मानूर । प्रतिनीधी

श्री तीर्थक्षेत्र नागनाथ देवस्थान जहागीरदार मठसंस्थान मानूर येथे परंपरेने अश्विन शुद्ध त्रयोदशी या दिवशी नागनाथ सांप्रदायाची अनोखी व ऐतिहासिक गणयात्रा पार पडत असते. तरी यावर्षी ही नऊगणयात्रा वार मंगळवार दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी तीन वाजता संपन्न होणार आहे. या गणयात्रेसाठी नागनाथ देवस्थानचे अनेक शिष्य सदभक्त हे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येत असतात. अश्विन शुद्ध नवमीच्या दिवशी नागनाथ देवस्थान मानूर येथून श्रीक्षेत्र नागतळा येथे पालखी जाते व आश्विन शुद्ध दशमीच्या दिवशी सकाळी सहा वाजता नागतळा



येथील नागनाथ महाराजांची मूर्ती घेऊन पालखी परत मानूर या ठिकाणी येत असते आल्यानंतर रात्री दहा वाजता नागनाथ महाराज यांचे दिव्य खड़ग मिरवणूक संपन्न होते.

पान ३ वर

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी लोककल्याणाचे कार्य केले: डॉ. भारती गडदे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी लोक कल्याणाचे काम केले आपल्या आयुष्यात अहिल्यादेवी यांनी अनेक जन उपयोगी कार्ये केली ,अनेक मंदिरे बांधली तसेच आपल्या राज्यातील प्रजा सुखी राहिली पाहिजे याची काळजी घेतली असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. भारती गडदे यांनी केले. येथील खोलेश्वर महाविद्यालय अंतर्गत तक्रार समिती व शारदा उत्सव समितीच्या वतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात अहिल्यादेवी होळकर यांचं नेतृत्व या विषयावर त्या बोलत होत्या.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भा.शि.प्र. संस्थेच्या केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती त्रिशताब्दी समितीच्या केंद्रीय अध्यक्षा सौ. ज्योतीताई ठाकूर , प्रमुख अतिथी म्हणून केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती त्रिशताब्दी वर्ष समितीच्या सदस्या शुभदाताई देशमुख, केंद्रीय कार्यकारणी सदस्या डॉ. कल्पनाताई चौसाळकर व वर्षाताई मुंडे, राष्ट्रसेविका समितीच्या पूर्णवेळ प्रचारक कल्याणी ताई पाठक , व्यवसाय शिक्षण विभागाचे उपप्राचार्य डॉ. रविंद्र कुंबेफळकर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती त्रिशताब्दी समितीच्या सदस्या प्रा. डॉ. रोहिणी अंकुश आदींची उपस्थिती

पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# मेट्रोच्या पाठपुराव्याला यश- आमदार भीमराव तापकीर



पुणे । प्रतिनिधी

खडकवासला - पुणे मेट्रो टप्पा - २ मधील अतिशय महत्वाच्या मेट्रो रेल्वे मार्गीकेच्या कामाला आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. गेली काही वर्षे मेट्रोच्या पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यातील प्रकल्पासाठी सातत्याने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा केला होता. पाठपुराव्याला यश आले. अशी प्रतिक्रिया आमदार भीमराव तापकीर यांनी दिली.

खडकवासला, स्वारगेट, हडपसर ते खराडी, एसएनडीटी ते वारजे माणिकबाग आणि स्वारगेट ते कात्रज यासाठी पाठपुरावा केला. आजच्या बैठकीपूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची देखील भेट घेऊन या संदर्भात चर्चा केली होती. वरील प्रस्तावित मेट्रोच्या मार्गाची पाहणी मेट्रोचे संचालक अतुल गाडगीळ यांच्या समवेत चार डिसेंबर २०२४ रोजी केली होती.

या मार्गावर कोल्हेवाडी फाटा (सीडब्ल्यूपीआरएस) संस्था, दळवीवाडी, नांदेड सिटी प्रवेशद्वार, धायरी फाटा, फन टाईम थिएटर, माणिकबाग, हिंगणे चौक, राजाराम पूल, पु.ल. देशपांडे उद्यान, दांडेकर पूल मार्गे स्वारगेट नॉर्थ, सेवन लव्ह चौक, पुणे कॅन्टोन्मेंट बोर्ड, रेस कोर्स, फातिमानगर, रामटेकडी, हडपसर, मगरपट्टा साउथ, मगरपट्टा मेन, मगरपट्टा नॉर्थ, हडपसर रेल्वे स्टेशन, साईनाथ नगर व खराडी चौक असे थांबे असणार आहेत. एसएनडीटी ते वारजे माणिकबाग या जोड लाईनला आजच्या बैठकीत देखील मान्यता दिली आहे. यामध्ये दौलतनगर(माणिकबाग), वारजे, कर्वेनगर, डहाणूकर कॉलनी, कर्वे पुतळा, पौड फाटा, एसएनडीटी(नळ स्टोप') असा मार्ग आहे. पहिल्या टप्प्यातील स्वारगेट ते कात्रज या मेट्रो मार्गिकेसाठी पाठपुरावा केला. या मार्गामुळे गुलटेकडी, मार्केट यार्ड, पद्मावती, बिबवेवाडी, धनकवडी, बालाजीनगर, कात्रज, यासह बालाजीनगरचा थांबा करण्याच्या मागणी केली होती. टी देखील मजूर झाली आहे. दरम्यान एसएनडीटी ते वारजे येथून वारजे गावठाण, शिवणे-उत्तमनगर, कोंढवे धावडे परिसरात याचा विस्तार करावा. अशी ही मागणी केली.

# पुणे आरटीओ कार्यालयात चोरी ; सीसीटीव्ही कॅमेरे, वायफाय राउटर चोरट्याने केले गायब

पुणे । प्रतिनिधी

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथील कच्चा परवाना परीक्षा विभाग म्हणजेच लर्निंग लायसन्स एक्झाम हॉल येथे चोरी झाल्याची घटना सोमवारी (दि.१४) उघडकीस आली आहे. विकेंड आणि सणासुदीच्या सुट्ट्यांचा फायदा घेत, चोरट्याने लर्निंग लायसन्स एक्झाम विभागात घुसखोरी केली. या विभागातील दोन सीसीटीव्ही कॅमेरे आणि वायफाय राऊटर घेऊन चोरट्याने धूम ठोकल्याची माहिती आरटीओ प्रशासनाकडून देण्यात आले आहे.

शनिवार, रविवार आणि दसरा निमित्ताने मिळालेल्या सुट्ट्यामुळे पुणे आरटीओ कार्यालय गेले दोन दिवस बंद होते. याचाच फायदा घेत कार्यालयाच्या मागील बाजूस असलेल्या झाडीतून चोरटा आत घुसल्याची प्राथमिक माहिती आहे. आत आल्यानंतर चोरट्यांनी सर्वप्रथम खिडकीचे रेलिंग तोडून परीक्षा हॉलमध्ये प्रवेश केला आणि येथील दोन सीसीटीव्ही कॅमेरे वायफाय राऊटर घेऊन धूम ठोकल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान परीक्षा हॉलमध्ये लर्निंग लायसन्ससाठी आवश्यक असलेले संगणक देखील होते. मात्र, या कशालाही चोरट्यांनी हात लावला नसल्याचे आरटीओ कडून सांगण्यात आले आहे. अशा घटना आरटीओ कार्यालयात होत असतील तर येथील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असल्याचे समोर आले आहे.

तसेच कार्यालयाला दोन दिवस सुट्टी होती, मग येथील सुरक्षा व्यवस्थेचे आरटीओकडून नियोजन करण्यात आले आहे की नाही, आले असेल तर मग सुरक्षा रक्षक चोरी होत असताना कुठे होते, असा सवालही यावेळी कच्चा परवाना परीक्षार्थीनकडून विचारला जात आहे. आरटीओ अधिकारी म्हणाले, या घटनेबाबत आम्ही माहिती घेतली आहे. याबाबत स्थानिक पोलिसांमध्ये तक्रार देण्याचे काम सुरू आहे. घटनेचा तपास पोलिसांकडून केला जाणार आहे. येथे उद्भवलेल्या परिस्थितीचा कच्चा परवाना परीक्षेवर कोणताही परिणाम झाला नसून येथील कामकाज सुरळीत सुरू आहे.

# कलाकारांसाठी कलाग्राम ठरणार हक्काचे व्यासपीठ : केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ



पुणे । प्रतिनिधी

आपले पुणे ही जशी सांस्कृतिक नगरी आहे, तशीच ती कलाकारांचीही नगरी आहे. कलाकरांना कलाविष्कार सादर करण्यासाठी विविध व्यासपीठे पुण्यनगरीने उपलब्ध करून दिलेली आहेत. आणि आता याच पुण्यनगरीत कलाकारांसाठी हक्काचे व्यासपीठ असणारे कलाग्राम नक्कीच मोठा आधार ठरणार असल्याचे प्रतिपादन केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केले.

महापालिकेच्या पु. ल. देशपांडे उद्यान येथे विकसित केलेल्या कलाग्रामचे लोकार्पण मोहोळ यांच्या हस्ते झाले, त्या वेळी ते बोलत होते. या प्रसंगी आमदार माधुरी मिसाळ, महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले, भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे, युवा अध्यक्ष करण मिसाळ, श्रीकांत जगताप, किरण ठाकूर उपस्थित होते.

मोहोळ म्हणाले, या कलाग्रामच्या माध्यमातून विविध कलाविष्कार सादर करण्याची संधी कलाकारांना मिळणार असून, त्यांना आपले कलाविष्कार लोकांपर्यंत पोहचविणे सहजशक्य होणार आहे. कलाग्राममुळे पुण्याच्या कलाविश्वाच्या वैभवात भर पडली आहे. शहरात मेट्रो आली, नदीसुधार प्रकल्प सुरू आहे. काँग्रेसच्या सत्ताकाळात नुसती भूमिपूजने झाली. पण, मोदी सरकार प्रत्यक्षात प्रकल्प साकारत आहेत. त्यामुळेच शहराचा चेहरामोहरा बदलला. आमदार मिसाळ म्हणाल्या, सिंहगड रोडला पन्नास एकर जागेत पहिल्या टप्यात पु. ल. देशपांडे उद्यान झाले. आता कलाग्राम पूर्ण झाल्याने परिसर विकसित झाला आहे. प्रास्ताविक आयुक्त भोसले यांनी केले. सूत्रसंचालन मिलिंद कुलकर्णी यांनी केले.

# वीर बाजी पासलकर यांचे वंशज राजाभाऊ पासलकर यांनी घेतली स्वराज्याच्या लढवय्या विरांच्या वंशजांची भेट





पुणे । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांनी उभारलेल्या स्वराज्याच्या लढ्यात अनेक लढवय्या यौद्ध्यांनी महापराक्रम केले. अशा महा पराक्रमी लढय्यांच्या वंशजाची भेट वीर बाजी पासलकर यांचे वंशज राजाभाऊ पासलकर यांनी नुकतीच घेतली. यावेळी सगळेजण भारावून गेले होते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य निर्मितीसाठी निस्सीम ताकद, कर्तृत्व आणि शौर्याने साथ देणारे तानाजी मालुसरे यांचे वंशज कुणाल दादा मालुसरे, सेनापती हंबीरराव मोहिते यांचे वंशज निहार सिंह मोहिते, महाराणी येसूबाई यांचे वंशज दिपक राजे शिर्के, धार रियासत राजे यांचे वंशज यशोधनराजे पवार या सर्वांना एकत्रीत भेटण्याचा योग वीर बाजी पासलकर यांचे वंशज राजाभाऊ पासलकर यांना आला. या ऐतिहासिक वंशजा समवेतची भेट आणि संवाद म्हणजे हा जीवनातील एक बहुमोल क्षण होता आणि या पेक्षा भाग्य ते कोणते अशी प्रतिक्रिया यावेळी राजाभाऊ पासलकर यांनी व्यक्त केली.

# इनामगाव परिसरामध्ये बिबट्यांचा वावर

शिरूर : इनामगाव (ता. शिरूर) परिसरात अनेक दिवसांपासून बिबट्यांचा वावर दिसून येत आहे. बिबट्यांनी नागरिकांसह अनेक शेळ्या, कुत्री, मेंढ्या, कोंबड्या, वासरे यांच्यावर हल्ले केले आहेत. मात्र अजूनही बिबट्यांना पकडण्यात वन विभागाला यश आलेले नाही. त्यामुळे वन विभागाने तातडीने बिबट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी सरपंच अनुराधा घाडगे यांनी केली आहे.



इनामगावात बिबट्यांची दहशत निर्माण झाली आहे. शिवनगर येथे काही महिलांना बिबट्या दिसून आला. तर शिरूरच्या पूर्व भागामध्ये वन विभागाने यापूर्वी चार ते पाच बिबटे पकडले आहेत. तसेच बछडे देखील ऊसामध्ये आढळून आले होते. अनेक नागरिकांनी पाळीव प्राण्यांच्या सुरक्षेसाठी गोठे तयार केले आहेत. तरी देखील बिबटे हल्ले करित आहेत. त्यामुळे नागरिक वैतागले आहेत. रात्रीचा प्रवास करणे सुद्धा या परिसरामध्ये अवघड होऊन बसले आहे. पायी चालणार्या नागरिकांना तर जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. अनेक वेळा वन विभागाला ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विबट्यांचा बंदोबस्त करावा यासाठी निवेदने देण्यात आली. तरी देखील या भागामध्ये वन विभागाच्या माध्यमातून म्हणावा असा बिबट्याचा बंदोबस्त करण्यात यश आलेले नाही.

# तळेगावमध्ये भव्य पोतसोहळा रंगला ; मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी



तळेगाव ढमढेरे - दसऱ्याच्या निमित्ताने तळेगाव ढमढेरे येथ मुख्य बाजार पेठेत भव्य पोतसोहळा रंगला. तर खंडोबा देवाच्या भेटीसाठी गावातील श्रीनाथ महाराज, श्री सिद्धेश्वर महाराज, उत्तरेश्वर पालखी सायंकाळी ५ वाजता वाजत-गाजत बाजार मैदान मार्गे श्री खंडोबा देवाची भेट घेण्यासाठी मार्गस्थ झाला. यावेळी पालखी सोहळ्याचे दर्शन घेण्यासाठी मोठ्या गावातील नागरिक व भाविक उपस्थित होते.

तर रात्री ८ वाजता तळेगाव ढमढेरे मुख्य वेशीपासून पोत सोहळयास सुरुवात झाली. यामध्ये जय तुळजाभवानी पोत सोहळा अखिल होळी मैदान, तुळजा भवानी पोत सोहळा, भवानीमाता पोतसोहळा असे तीन पोत सोहळे संपन्न झाले. पोत पाजळत ढोल तशाच्या गजरात पोत नाचविण्यासाठी युवा पिढी मोठ्या प्रमाणात पुढे सरसावलेली पाहायला मिळाली. बाजारपेठेमार्गे हुतात्मा विष्णू गणेश पिंगळे चौकापर्यंत हा सोहळा संपन्न झाला. यामध्ये गावातील विविध स्तरातील पदाधिकारी उपस्थित होते.

पोलीस प्रशासनाच्या वतीने देण्यात आलेल्या वेळेत पोतसोहळ्याची सांगता झाली. दिवसा दुर्गामता देवीची ,सावता नवरात्र उत्सव मंडळ व अखिल होळी मैदान नवरात्र उत्सव मंडळाच्या देवीची मिरवणूक सुद्दा ढोल तशाच्या गजरात शांततेत पार पडल्या. शांतता व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी शिक्रापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दीपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहिणी सोनवले, पोलीस हवालदार अमोल चव्हाण, संदीप कारंडे, आत्माराम तळोले, स्वप्नील गांडेकर, बिट अंमलदार किशोर तेलंग यांनी चोख बंदोबस्त केला. श्री क्षेत्र तुळजापूर येथे तुळजा भवानी मंदिरामध्ये कोजागिरी पौर्णिमेला २५० वर्षांपासून सोलापूर काठी सोहळ्याच्या पुढे पोत पाजळण्याचा मान तळेगावकरांना आहे. या कार्यक्रमासाठी तळेगाव ढमढेरे येथील भाविक कोजागिरीला तुळजापूरला रवाना होतात, अशी माहिती पोतसोहळ्याचे समन्वयक बाळासाहेब ढमढेरे यांनी सांगितली.

# दोनशे फूट उंच फडकणार हिंदुत्वाचा भगवा ध्वज; भाजपा आमदार महेश लांडगे याचा यशस्वी पाठपुरावा

पिंपरी - तीर्थक्षेत्र देहू आणि आळंदीचे सान्निध्य लाभलेल्या पिंपरी-चिंचवड शहराला संत आणि वारकरी सांप्रदायाची गौरवशाली परंपरा आहे. आषाढी वारी पालखी सोहळा आणि वर्षभरात तीर्थक्षेत्र आळंदी येथे लाखो वारकरी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या दर्शनासाठी येतात. आळंदीतून दरवर्षी वैष्णवांचा मेळा पांडुरंगाच्या नामस्मरणाचा जयघोष करत पंढरपूरकडे मार्गक्रमण करतो.

या पालखी महामार्गावर वैष्णवांच्या भक्तीसोबत हिंदुत्वाचे भगवे निशाण फडकले जावे, अशी संकल्पना भाजपा आमदार महेश लांडगे यांनी मांडली आणि त्यासाठी पाठपुरावा सुरू केला होता. त्याला मूर्त स्वरूप प्राप्त झाले आहे .पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी या प्रस्तावाला मान्यता दिली आहे. चऱ्होलीतील थोरल्या पादुका मंदिराजवळ २०० फुटी उंच भगवा ध्वज उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. महाराष्ट्रातील लाखो वारकरी देहू-आळंदी-पंढरपूर पालखी मार्गावरून वारी करतात. या मार्गावर चऱ्होलीतील थोरल्या पादुका



मंदिराजवळ संतसृष्टी उभारण्यात आली आहे. महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून या भक्ती मार्गावर वारकरी आणि हिंदू धर्माचे पवित्र निशाण असलेला भगवा ध्वज उभारावा, अशी आग्रही मागणी आमदार महेश लांडगे यांनी केली होती.

महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून भारतीय हिंदू संस्कृतीची महिती सांगणारा तसेच त्याग, बलिदान व अभिमानाचे जाज्वल्य प्रतीक असलेला भगवा ध्वज थोरल्या पादुका मंदिर, चऱ्होली येथे उभारावा. त्याची उंची २०० फूट इतकी असावी, या कामाला महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली. तसेच, निविदा प्रक्रिया राबण्यात येत असून, देहू-आळंदी-पंढरपूर पालखी महामार्गावर थोरल्या पादुका मंदिरासमोर हा ध्वज उभारण्यात येत आहे.

हिंदूत्व आणि सनातन धर्माचे प्रतीक असलेला भगवा ध्वज उभारला जावा. यासाठी पालखी महामार्गावरील ठिकाण निश्चित करावे. या करिता शहरासह पुणे जिल्ह्यातील शिव-शंभू प्रेमींसह हिंदुत्ववादी संघटनांकडून मागणी केली जात होती. भगवा ध्वज त्याग-राष्ट्रभक्ती आणि समर्पणाचे प्रतीक आहे. या मूल्यांची प्रेरणा समाजाला मिळावी. या करिता भव्य ध्वज उभारण्याची संकल्पना पुढे आली. त्याला आता मूर्त स्वरुप मिळाले आहे.

# मानलेल्या भावाकडून चार वर्षांच्या भाचीवर अत्याचार

पुणे - मुंढवा परिसरात एकाने चार वर्षांच्या मुलीवर अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. रविवारी (ता. १३) घोरपडीतील लोहमार्गाजवळ त्याने बालिकेवर अत्याचार केला आहे. अत्याचार करणाऱ्याला मुलीच्या आईने भाऊ मानलेला होता. त्यामुळे त्याचे सतत मुलीच्या घरी येणे -जाणे होते.


या प्रकरणी मुंढवा पोलिसांनी एकाविरुद्ध बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायद्यान्वये (पोक्सो) गुन्हा दाखल केला आहे.याबाबत एका महिलेने मुंढवा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार एका ३५ वर्षीय तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिलेने आरोपीला भाऊ मानले होते. त्याचे महिलेच्या घरी नेहमी येणे-जाणे होते.

रविवारी सकाळी महिला आणि तिचे पती घरात नव्हते. घरात कोणी नसल्याची संधी साधून आरोपी मुलीला घरातून बाहेर घेऊन गेला. त्यावेळी मुलीची मोठी बहीण घरात होती. तिने त्याला विरोध केला. त्यानंतर त्याने घोरपडीतील लोहमार्गाजवळ बालिकेवर अत्याचार केला. मुलीने हा प्रकार घरी सांगितल्यानंतर आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेची माहिती पोलिसांना समजताच मुलीला तातडीने ससून रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी पाठविण्यात आले. बालिकेवर अत्याचार करून आरोपी पसार झाला असून, त्याला पकडण्यासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आली आहे. वरिष्ठ पोलिस निरीक्षक निळकंठ जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करण्यात येत आहे.

# बोपदेव घाट अत्याचार प्रकरणातील दुसरा आरोपी ताब्यात; पुणे पोलिसांनी उत्तर प्रदेशातून केली अटक

पुण्यातील बोपदेव घाटात काही दिवसांपूर्वी एका २१ वर्षांच्या तरुणीवर झालेल्या सामुहिक अत्याचार प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. यामधील दुसऱ्या आरोपीला पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेनं उत्तर प्रदेशातील प्रयागराज इथून अटक केली आहे.





पोलिसांच्या माहितीनुसार, बोपदेव घाट अत्याचार प्रकरणातील तीन आरोपींपैकी दुसऱ्या २५ वर्षीय आरोपीला अटक करण्यात आली आहे. तीन आरोपींपैकी आत्तापर्यंत २ आरोपींना पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. या प्रकरणातील तिसरा आरोपी अद्यापही फरार असून पुणे पोलिसांकडून तिसऱ्या आरोपीचा शोध सुरू करण्यात आला आहे.

दरम्यान, या प्रकरणातील पहिल्या आरोपीला ११ ऑक्टोबर रोजी अटक झाली होती. चंद्रकुमार रवीप्रसाद कनोजिया (वय २०, डिंडोरी, मध्य प्रदेश) असं या आरोपीचं नाव आहे. यातील तिन्ही आरोपी हे सराईत गुन्हेगार आहेत. त्यांच्यावर जबरी चोरीचे गुन्हे दाखल आहेत.

आरोपींनी गुन्हा करण्यापूर्वी बोपदेव घाटात गुरुवारी (ता. ३) रात्री दहाच्या सुमारास मद्य प्राशन केले. त्यानंतर त्यांनी घाटात बसलेल्या तरुण-तरुणीला बांबूने मारहाण केली. कोयत्याच्या धाक दाखवून तिघांनी तरुणीवर लैंगिक अत्याचार केला. तरुणीवर अत्याचार केल्यानंतर आरोपी बोपदेव घाटातून दुचाकीवरून पसार झाले. त्यानंतर ते सातारा रस्त्यावरील शिंदेवाडी परिसरात गेले. पोलिसांना चकवा देण्यासाठी मुख्य रस्त्याऐवजी अंतर्गत रस्त्यांचा वापर केला. सुमारे २० किलोमीटरचे अंतर कापण्यासाठी ८० किलोमीटरचा प्रवास केला. सासवड परिसरात एका पेट्रोल पंपावरील चित्रीकरणात आरोपींचे चेहरे स्पष्ट आढळून आले होते. तसेच, एका मद्य विक्री दुकानात मद्य सेवन करीत असल्याचे दिसून आले.



# धनगर समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न सोडवा

पुणे, - धनगर समाजाच्या हक्काचे अनुसूचित जमातीचे (एसटी) आरक्षण तातडीने लागू करण्याचा शासन निर्णय तातडीने मंत्रिमंडळाच्या बैठकीत काढावा, या मागणीसाठी सकल धनगर समाजातर्फे पुण्यात ढोलवादन आंदोलन करण्यात आले.

सारसबागेजवळील पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुतळ्याला अभिवादन करून धनगर समाजबांधवांनी एसटी आरक्षण लागू करण्याची मागणी केली. पुणे, पिंपरी-चिंचवड परिसरातील शेकडो धनगर बांधव, भगिनी यामध्ये सहभागी झाले होते. समन्वयक ॲड. विजय गोफणे, सोमनाथ अनिकेत कवाने, डी. बी. नाईक, मधुसूदन बरकडे, योगेश खरात, महादेव वाघमोडे, विष्णुदास गावडे, सुनंदा गडदे, पिंटू कोकरे, भरत गुरव, डॉ. सुधाकर न्हाळदे, खंडू तांबडे यासह अन्य धनगर बांधव आदी उपस्थित होते. राज्यघटनेने धनगरांना एसटी प्रवर्गात आरक्षण दिलेले आहे. मात्र, राज्य सरकारकडून त्याची अंमलबजावणी केली जात नाही. आजवर अनेकदा धनगर समाजाची फसवणूक झाली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शब्दाला जगणारे नेते आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून आम्हाला अपेक्षा आहे. त्यामुळे मंत्रिमंडळ बैठकीचे यासंदर्भातील शासन निर्णय काढून मुख्यमंत्र्यांनी धनगर समाजाला दिलेला शब्द खरा करावा, अशी मागणी ॲड. गोफणे यांनी केली आहे.विधानसभा निवडणुकीत राज्यातील ८० ते ९० मतदारसंघात धनगर समाजाची निर्णायक भूमिका राहणार आहे, असेही नमूद करण्यात आले आहे.